। लातूर । वर्ष ३४ वे । अंक २०५ वा । गुरूवार, दिनांक ०६ नोव्हेंबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# पार्थ पवारांवर जमीन घोटाळ्याचा आरोप, मुख्यमंत्री फडणवीस यांचे चौकशीचे आदेश!



**मुंबई/प्रतिनिधी : उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या 'अमीडिया होल्डिंग्स एलएलपी' या कंपनीच्या जमीन खरेदीच्या व्यवहाराने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा भूकंप झाला आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे नेते अंबादास दानवे यांनी या व्यवहारात गंभीर अनियमितता असल्याचा आणि १८०४ कोटी बाजारभाव असलेली जमीन केवळ ३०० कोटींना विकत घेतल्याचा आरोप केला आहे. विशेष म्हणजे, या ४० एकर जमिनीच्या व्यवहारासाठी स्टॅम्प ड्युटी म्हणून केवळ ५०० भरण्यात आल्याचा आणि हा व्यवहार केवळ २७ दिवसांत पूर्ण झाल्याचा आरोपही दानवे यांनी केला आहे. महार वतनाची जमीन आणि सरकारी नियमांना बगल देऊन हा व्यवहार झाल्याचा विरोधकांचा दावा आहे. या आरोपामुळे राजकीय वातावरण तापले असतानाच, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर पहिली प्रतिक्रिया दिली आहे.**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पार्थ पवार यांच्या कंपनीवर झालेल्या या गंभीर आरोपांची गांभीर्याने दखल घेतली आहे. पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी या प्रकरणावर पहिली प्रतिक्रिया दिली आणि या जमीन खरेदी व्यवहाराची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

या प्रकरणाच्या संदर्भात सगळी माहिती मी मागवली आहे. महसूल विभाग, आयजीआर, लँड रेकॉर्ड असतील या संदर्भातील सगळी माहिती मागवली आहे. याप्रकरणी योग्य ते चौकशीचे आदेश दिलेले आहेत. ही सगळी माहिती आणि प्राथमिक चौकशीच्या आधारावर आहे. जे सांगायचे ते सांगणार आहे. माझ्याकडे अद्याप पूर्ण माहिती आलेली नाही. जे मुद्दे समोर आलेत ते गंभीर आहेत त्यामुळे त्याची योग्य प्रकारे माहिती घेऊनच बोललं पाहिजे. त्या दृष्टीने ही माहिती आज माझ्याकडे येणार आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार अशा प्रकाराला पाठीशी घालतील असं माझं मत नाही. कारण या संदर्भात आमच्या सरकारचे एक मत आहे. कुठेही अनियमितता झाली असेल तर त्याच्यावर कारवाई झालीच पाहिजे या मताचे आम्ही आहोत. त्यामुळे अनियमितता आहे की नाही हे पडताळून पाहिले जाईल. असेल तर त्याच्यावर अतिशय कडक कारवाई केली जाईल, असा इशारा मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला.

## पार्थ पवारांची प्रतिक्रिया



**या आरोपांनंतर पार्थ पवार यांनीही आपली पहिली प्रतिक्रिया दिली. त्यांनी माध्यमांना फोनवरून बोलताना, आपण कोणतेही चुकीचे काम अथवा घोटाळा केला नसल्याचे म्हटले.**

# लातूरमध्ये अतिरिक्त व्याजासाठी तरुणावर तलवारीने हल्ला

## धक्कादायक घटना सीसीटीव्हीमध्ये कैद



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरात पुन्हा एकदा तलवार आणि कोयत्याच्या हल्ल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. व्याजासह पैसे परत करुन देखील अतिरिक्त व्याजाची मागणी पूर्ण न केल्याने चार जणांनी एका तरुणावर तलवार, काठी आणि दगडांनी हल्ला केला आहे. ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीत स्पष्टपणे कैद झाली आहे. ही घटना शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या नाईक चौकात घडली आहे. जखमी झालेल्या तरुणावर लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरु

दरम्यान, या घटनेत जखमी झालेल्या तरुणाला गंभीर अवस्थेत लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. हल्ला करणाऱ्या चौघांचा शोध पोलीस घेत असून, त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मागील काही दिवसांत लातूरमध्ये कोयता आणि तलवार वापरून हल्ल्यांच्या घटना वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनांमुळे पोलिसांची भूमिकाही प्रश्नचिन्हाखाली आली आहे.

## ठाणे जिंकण्यासाठी गणेश नाईक, बारामती जिंकण्यासाठी मुरलीधर मोहोळ, भाजपकडून निवडणूक प्रभारींची घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया अखेर सुरू झाली असून मंगळवारी राज्य निवडणूक आयोगाने नगर परिषद आणि नगर पंचायतीच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला. त्यानंतर राजकीय हालचालींना वेग आलेला असून कायम निवडणुकीसाठी तयार असणाऱ्या भारतीय जनता पक्षाने २४ तासाच्या आत विभागानुसार निवडणूक प्रभारींची घोषणा केली आहे. महत्त्वाचे म्हणजे राज्यातील सत्तेत असणाऱ्या एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यात गणेश नाईक तर अजित पवार यांच्या बारामतीत मुरलीधर मोहोळ यांच्याकडे निवडणुकीची जबाबदारी देऊन भाजपने आगामी काळातील इरादे स्पष्ट केले आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत विरोधी पक्षासोबत जेवढा संघर्ष होईल तितकाच संघर्ष महायुतीतही होणार असल्याचे अटळ आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी भाजपकडून निवडणूक प्रमुख आणि निवडणूक प्रभारींची नियुक्ती करण्यात आली. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासाठी जबाबदार वाटप करण्यात आले आहे.

### स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक

## लातूर शहराची डॉ. अर्चना पाटील चाकूरकर तर ग्रामीणची आ. अभिमन्यू पवार यांच्यावर जबाबदारी





**लातूर/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना घेऊन आचारसंहिता लागू होताच राजकीय पक्षांकडूनही तयारी सुरु झाली आहे. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी राज्यातील निवडणूक प्रमुख आणि प्रभारी यांची नियुक्ती केली असून लातूर शहर व ग्रामीणच्या निवडणूक प्रभारीपदी माजी मंत्री तथा आ. संभाजी पाटील निलंगेकर यांची निवड झाली आहे. लातूर शहर निवडणूक प्रमुखपदी डॉ. अर्चना पाटील-चाकूरकर तर लातूर

ग्रामीण निवडणूक प्रमुख म्हणून आ. अभिमन्यू पवार हे काम पाहणार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांना घेऊन रणधुमाळी सुरु झाली आहे. यामुळे स्थानिक पातळीवरील राजकारण ढवळून निघणार आहे तर राजकीय पक्षांकडून मोर्चेबांधणीला सुरुवात झाली आहे. गावपातळीवरील राजकारण लक्षात घेता निवडणुकीची जबाबदारी ही त्या जिल्ह्यातील नेत्यांवर टाकली जात आहे. त्याच अनुषंगाने निवडणूक प्रभारी म्हणून आ. संभाजी पाटील निलंगेकर हे काम पाहणार आहेत तर लातूर शहर मतदारसंघात डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांची निवडणुक प्रमुख म्हणून निवड झाली आहे. लातूर ग्रामीणमध्ये आमदार अभिमन्यू पवार हे निवडणुक प्रमुख म्हणून काम पाहणार आहेत.

# सांघिक भावना खेळाडूंना भविष्यात यशाचा मार्ग दाखवते - प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे



बाभळगाव : हॉकी हा मैदानी खेळातील सर्वात वेगवान क्रीडा प्रकार आहे. शालेय जीवनात असे खेळ खेळणाऱ्या खेळाडूंचे स्नायू आणि हाडे मजबूत होतात. खेळाडूंच्या डोळ्यांमध्ये आणि हातामध्ये यामुळे समन्वय साधला जातो. आज सामाजिक आणि मानसिक आरोग्य धोक्यात आले आहे. या खेळामुळे खेळाडूंचे सांघिक, सामाजिक स्वास्थ्य सुधारते आणि खेळाडूंनाआयुष्यातस्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी यशाचा मार्ग सापडतो, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी केले.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र, पुणे अंतर्गत क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी, लातूर व दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगावच्या कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव द्वारा संचलित जिल्हास्तरीय शालेय हॉकी व नेहरू हॉकी क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करताना उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे बोलत होते. या स्पर्धेमध्ये हनुमान विद्यालय, बिंदगीहळ, कै. व्यंकटराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय, बाभळगाव, दयानंद विद्यालय, बाभळगाव,सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लातूर, कॉक्सिट जुनिअर कॉलेज, लातूर, शारदा कनिष्ठ महाविद्यालय, लातूर, शारदा इंटरनॅशनल स्कूल, लातूर युनिव्हर्सल पब्लिक स्कूल, औराद शहाजनी इत्यादी संघानी सहभाग नोंदवला.

यावेळी खेळाडूंचा परिचय आणि कार्यक्रमाचे प्रास्ताविक हनुमान विद्यालय, बिंदगीहाळ येथील शिंदे सर यांनी करून दिला. यावेळी देवडे सर, श्री सुरज मोरे, श्री विजय सर, श्री दुर्वे सर, साहिल संदूरले यांची उपस्थिती होती. उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. बिडवे महारुद्र तर आभार इमाम शेख यांनी मानले.

# दयानंद विधी महाविद्यालयात 'CPC' विषयावर मॅरेथॉन व्याख्यान

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद एज्युकेशन सोसायटीच्या दयानंद विधी महाविद्यालयात ह्युमन राईट्स एज्युकेशन सेंटर तर्फे The Code of Civil Procedure, 1908 (CPC) या विषयावर एक दिवसीय मॅरेथॉन व्याख्यानाचे आयोजन उत्साहात पार पडले.

या शैक्षणिक उपक्रमाला विद्यार्थ्यांचा, अधिवक्त्यांचा आणि प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ११० विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थित राहिले, तर ५० विद्यार्थ्यांनी यूट्यूबद्वारे ऑनलाईन सहभाग घेतला.

या मॅरेथॉन व्याख्यानासाठी डॉ. गोपाल पांचाळ यांनी संसाधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन केले. त्यांनी CPC मधील महत्त्वपूर्ण प्रकरणे - क्षेत्राधिकार, प्लिडिंग्ज, अंतरिम आदेश, डिक्रीची अंमलबजावणी आणि अपील - यांचे सविस्तर विवेचन केले. त्यांच्या विश्लेषणात्मक व अनुभवसंपन्न मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना नागरी प्रक्रिया संहितेतील गुंतागुंतीचे मुद्दे अधिक सोप्या भाषेत समजले.

कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्या डॉ. पूनम नाथानी यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक परिपूर्णतेसाठी आणि व्यावसायिक घडणीत अशा उपक्रमांचे महत्त्व पटवून दिले. या व्याख्यानाचे समन्वयन असिस्टंट प्रोफेसर श्रद्धा चौधरी यांनी केले, तर संपूर्ण कार्यक्रमाचे शैक्षणिक मार्गदर्शन डॉ. पूनम नाथानी यांचे लाभले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरामन लहोटी, चेअरमन श्री. रमेश बियाणी आणि श्री. आशिष बाजपाई यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांच्या प्रेरणादायी नेतृत्वामुळे हा शैक्षणिक उपक्रम अधिक परिणामकारक ठरला.

या मॅरेथॉन व्याख्यानातून विद्यार्थ्यांना नागरी प्रक्रिया संहितेचा सखोल अभ्यास करण्याची संधी मिळाली. कायदे व्यवसायातील मूलभूत प्रक्रिया आणि तांत्रिक बाबींविषयी स्पष्टता निर्माण झाली. कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने करण्यात आली.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**न्यूयॉर्कच्या महापौर निवडणुकीत भारतीयवंशी ममदानी विजयी...**

## चिमटा दयाचा



**लातुरात पर्यायी रस्त्याचा अभाव आहे ! त्यामुळे अपघाताच्या प्रमाणात वाढ होत आहे!! आहे त्या रस्त्यावर अतिक्रमणे वाढली आहेत!!!**

# रुद्धा येथील बाप-लेकाच्या निघृण खुनाचा छडा अवघ्या आठ तासांत-दोघांना अटक

**लातूर/प्रतिनिधी :** अहमदपूर तालुक्यातील रुद्धा येथील शेतशिवारात सोमवार ते मंगळवारच्या मध्यरात्री झालेल्या बाप-लेकाच्या निघृण खुनाचा अवघ्या आठ तासांत छडा लावून दोघांना अटक करण्यात स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस ठाणे अहमदपूर यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.

दिनांक ३ ते ४ नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटे अहमदपूर तालुक्यातील रुद्धा शिवारात स्वतःच्या शेतीतील आखाड्यावर शिवराज निवृत्ती सुरनर (वय ७० वर्षे) आणि त्यांचा मुलगा विश्वनाथ शिवराज सुरनर (वय २० वर्षे) या दोघांचा अज्ञात व्यक्तींनी धारदार शस्त्राने वार करून खून केला असल्याची माहिती अहमदपूर पोलीस ठाण्यास प्राप्त झाली.

सदर घटनेची गंभीर दखल घेऊन अहमदपूर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदविण्यात आला. घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी तत्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांसह घटनास्थळी भेट




देऊन गुन्ह्याचा तातडीने तपास सुरू करण्याच्या सूचना दिल्या.

खुनाचा तपास वेगाने आणि काटेकोरपणे करण्यासाठी अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी अहमदपूर रायबोले यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस ठाणे अहमदपूर यांचे संयुक्त पथक नेमण्यात आले.

पथकाने गुन्ह्याचे स्वरूप, घटनास्थळावरील पुरावे, साक्षीदारांचे जबाब, आणि मृत व्यक्तींशी असलेल्या वैयक्तिक वादांचा बारकाईने अभ्यास केला. तपासादरम्यान जमिनीच्या वादातून ही दुर्दैवी घटना घडल्याचे निष्पन्न झाले.

तपासादरम्यान संशयितांवर लक्ष केंद्रित करून पोलिसांनी अत्यंत कौशल्याने आणि जलद हालचालीत अवघ्या आठ तासांत खालील दोघाना अटक केली आहे. नरसिंग भाऊराव शिंदे (वय ६० वर्षे) तर केरबा नरसिंग शिंदे (वय २३ वर्षे) (दोघे रा. करेवाडी, ता. लोहा, जि. नांदेड) असे असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू असून, दोघाना पोलीस कोठडी मिळविण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक . मंगेश चव्हाण यांच्या देखरेखीखाली, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी रायबोले यांच्या नेतृत्वात संयुक्त पथकातील पोलीस निरीक्षक विनोद म्हेत्रेवार, सुधाकर बावकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, संतोष केदासे, पो.उ.नि. राजेश घाडगे, प्रमोद देशमुख, तसेच पोलीस अंमलदार संजय कांबळे, रामलिंग शिंदे, साहेबराव हाके, अर्जुन राजपुत, दिनानाथ देवकते, युवराज गिरी, माधव बिलापटटे, नवनाथ हासबे, राजेश कचे, तुराब पठाण, मुन्ना मदने, जमीर शेख, पाराजी पुठठेवाड, तुळशीराम बरुरे, राहुल काबळे, शैलेश सुडे, गणेश साठे, व्यंकटेश निदुरे, श्रीनिवास जांभळे तसेच पोलीस ठाणे अहमदपूर येथील तानाजी आरदवाड, विशाल सारुळे, कांबळवाड, महिला पोलीस अंमलदार अंजली गायकवाड आदींचा समावेश होता.

अत्यंत गंभीर स्वरूपाच्या या दुहेरी खुनाच्या गुन्ह्यात पोलिसांनी दाखविलेली वेगवान व परिणामकारक कार्यवाही उल्लेखनीय आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हा पोलीस दल सदैव तत्पर असून अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी ठोस पावले उचलली जातील, असे पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी सांगितले.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ॥

# लातूर समाचार

## ग्रामीण भागात आता निवडणुक उत्सव...

राज्यात ग्रामीण भागात आता निवडणुक उत्सव पार पडणार आहे. अनेक वर्षापासून म्हणजे करोना साथरोगापासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पहिल्या टप्प्यातील निवडणुकांचा कार्यक्रम सर्वोच्च न्यायालयाच्या दट्ट्यामुळे अखेर राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला. राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगर पंचायतींची निवडणूक २ डिसेंबरला होणार आहेत. मतदारयाद्यांमधील घोळावरून महाविकास आघाडी आणि मनसेने राळ उठविल्यानेच दुबार मतदारांना रोखण्याचे निवडणूक आयोगाने जाहीर केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारीपूर्वी राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण करण्याचा आदेश दिला होता. यानुसार पहिल्या टप्प्यात २८८ नगरपालिका आणि नगर पंचायतींच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. २ डिसेंबरला मतदान तर दुसऱ्या दिवशी म्हणजे ३ तारखेला मतमोजणी होणार आहे. एकूण ६,८५९ जागांसाठी मतदान होईल. नगरपालिका आणि नगर पंचायतींच्या नगराध्यक्षपदाची थेट निवडणूक असल्याने २८८ नगराध्यक्षपदासाठी निवडणूक होणार आहे. नगरपालिकांसाठी दोन सदस्यीय प्रभाग पद्धत आहे. काही ठिकाणी एका प्रभागात तीन सदस्य निवडून येतील. नगर पंचायतींमध्ये एक सदस्यीय प्रभाग आहेत. सुमारे एक कोटी मतदारांना दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळा मतदान यंत्राची कळ दाबावी लागणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याचे राज्य निवडणूक आयुक्तांनी स्पष्ट केले. दुसऱ्या टप्प्यात डिसेंबरअखेर जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती तर १५ जानेवारीच्या आसपास मुंबईसह २९ महानगरपालिकांची निवडणूक होण्याची शक्यता आहे. मतदारयाद्यांमधील घोळावरून महाविकास आघाडी आणि मनसेने आक्रमक भूमिका घेतली आहे. मतदारयाद्यांमध्ये सुधारणा झाल्यावरच निवडणुका घेण्याची मागणी विरोधकांनी केली होती. पण विरोधकांची ही मागणी राज्य निवडणूक आयोगाने फेटाळून लावली. काही झाले तरी ही ग्रामीण भागातील निवडणुक महत्वाची ठरते. याचा अंदाज अनेक राजकिय नेत्यास येतो. राजकीय अंदाजानुसार आगामी वाटचालीस दिशा ठरते. ज्या पक्षाच्या मागे ग्रामीण भाग असतो त्याच पक्षाला आगामी काळात चांगले भवितव्य समजले जाते. त्यामुळे ही स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणुक महत्वाची ठरते. राज्यातील ही निवडणुक देशात कोरोनाचे संकट निर्माण झाल्याने पुढे ढकलली होती. ही निवडणुक लागावी यासाठी अनेकांनी प्रयत्न केले शेवटी न्यायालयाच्या निर्देशानुसार आयोगाने निवडणुक कार्यक्रम जाहिर करावा लागला. त्यामुळे राज्यात जवळपास सर्वच राजकिय पक्ष कामाला लागले आहेत. आचारसंहीता लागू झाल्याने अनेक राजकिय पक्षाचे बॅनर हाटविण्यात आले आहेत. विरोधीपक्षाने ज्याकाही तक्रारी केल्या आहेत. त्याचा विचार होण्याची शक्यता आहे. त्याच प्रमाणे राज्यातील मतदारांनी जागृत राहाणे आवश्यक आहे. डबल मतदार निर्माण होता कामा नये. निवडणुका आयोग काही बाबीचा विचार करू शकेल. आता खरी कसोटी ग्रामीण भागातील मतदाराबरोबर शहरी भागातील मतदाराची आहे. ग्रामीण भागातील नागरिक बऱ्यापैकी मतदान करते मात्र शहरी भागातील मतदानाची टक्केवारी वाढण्याची गरज आहे. सर्वात महत्वाची निवडणुक मुंबई महानगर पाहिलेची समजली जाते. यात भाजपा पुर्ण ताकद लावणार आहे. त्यापेक्षा उद्धव व राज ठाकरे मिळून या निवडणुकीत उतरणार का? ही बाब अधुरेखीत आहे. सध्याला दोघा भावामध्ये जवळीकता वाढली आहे. त्यामुळे मोठ्या शहरात याचा परिणाम दिसून येण्याची शक्यता आहे. राज ठाकरे यांच्याकडे तरूण वर्ग खेचला जातो. मराठी हा मुद्दा राज ठाकरे यांनी लाऊन धरला आहे. त्यामुळे मनसेकडे मुंबई सह मोठ्या शहरात मतदार कोणाकडे झुकेल हा देखिल महत्वाची बाब आहे. ग्रामीण भागातील निसर्गाच्या पावसामुळे सर्व बाबी विस्कळीत झाल्या आहेत. ग्रामीण भागासह तालुकास्तरावरील नगरपालिकेच्या हाद्दीतील निवडणुकीतील मतदार हा विचारपुर्वक मतदान करण्याची शक्यता आहे. संकट काळात दिवाळीपुर्वी मदतीचे आश्वासन दिले होते ते कांही प्रमाणात पुर्ण झाले नाही. त्यामुळे मतदार हा काही प्रमाणात नाराज असण्याची शक्यता आहे. आता आचारसंहीता लागू झाल्याने अनुदानावर याचा परिणाम होणार का नाही हे अजून स्पष्ट झाली नाही. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या भागात मतदार हा ग्रामीण भागातील आहे. नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीत मतदार विचारी असतो. तो ठरवुन विचारपुर्वक मतदान करीत असतो हा अंदाज आहे. त्यामुळे सर्वाधिक रंगतदार होणार ती नगरपालिकेची निवडणुक! अनेक वर्षापासून स्थानिक स्वराज्य संस्थेत निवडणुकाच झाल्या नाहीत. प्रशासकिय राज असल्याने नागरिक कंठाळलेले होते. अनेक पक्षाने नेते हे निवडणुक कधी लागेल व उमेदवार होऊन मतदाराच्यासमोर कधी जाऊ अशाच अर्विभावात होते. अनेकांची ईच्छुकांची अपेक्षा आता पुर्ण होणार आहे. उमेदवरांची संख्या वाढणार आहे असे चिन्ह दिसून येते. राजकिय पक्षाला आपल्याच पक्षाचे वर्चस्व राहावे याचा मोठा प्रयत्न करणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील मतदरांनी विचारपुर्वक मतदान करण्याची गरज आहे. मतदारांनी आपल्या भागातील, प्रभागाचा विकास करणारा असाच उमेदवार निवडला पाहिजे. नगरपंचायत व नगरपालिकेच्या क्षेत्रात मोठ्या समस्या नसतात. लाईट, वेळेवर पाणी व रस्ते हे महत्वाची कामे आहेत, ती मुलभूत कामे करणाऱ्यास निवडले पाहिजे. बऱ्याच वेळा निवडणुक आल्यावर जनतेच्या संपर्कात येतात अशा उमेदवारांची निवड यदाकदाचित चुकीची ठरू शकते. त्यामुळे योग्य उमेदवार व विकासाची कामाची जाण असणाऱ्यांना निवडले पाहिजे. लोकशाहीने जनतेसाठी आपल्या पसंतीचे उमेदवार म्हणजे लोकप्रतिनधी निवडून देण्याची मोठी जबाबदारी मतदारांवर आली आहे. त्यामुळे काळजीपुर्वक आपले स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधी निवडले जावे. विचारपुर्वक व सर्वांनी मतदानादिवशी वेळ कादून मतदान करणे आवश्यक आहे.

# संघर्षातून समृद्धीकडे: 'समर्थ फुड्स'च्या सुगरणीची कहाणी!

## काम छोटे-मोठे नसते; दृष्टिकोन मोठा असतो

कधी कधी संकटे आपल्याला मागे ढकलत नाहीत... उलट, आपण कोण आहोत, किती सक्षम आहोत - हेच अडचणी आपल्याला जाणवून देतात. प्रितम जाधव यांची कथा याच विचाराचं जिवंत उदाहरण आहे. आयुष्यात आलेल्या वैयक्तिक वादळात न डगमगता, त्यांनी आपल्या लहानशा स्वयंपाकघरातून एका मराठमोळ्या ब्रँडची ठिणगी टाकली आणि 'समर्थ फुड्स'च्या 'सुगरणीचे लोणचे' या नावाने एक यशस्वी उद्योग उभा केला. त्यांचा हा प्रवास केवळ एका महिलेचा नव्हे, तर 'साध्या स्त्रीपासून व्यवसायिनी' बनलेल्या एका दृढनिश्र्चयी आत्मविश्र्वासाची कथा आहे. त्यांची ही वाटचाल सांगते काम छोटं-मोठं नसतं; दृष्टिकोन मोठा असतो.

आजही तो सन २0२0 चा कोरोना काळ आठवला की, मन स्तब्द होत. कोरोना म्हणजे मानवावरील संकट जगभर भीती आणि बंदिस्त जीवन होता. या कठीण काळात प्रितम जाधव यांच्या समोर कोरोना एवढाच दुसरा अडचणीचा डोंगर आयुष्यात उभा राहीला. तो काळ त्यांच्यासाठी नवा प्रवास सुरू करणारा ठरला. आयुष्यात आलेल्या वैयक्तिक संकटांनी त्या खचल्या नाहीत; उलट अडचण हीच संधी या विचाराने प्रेरित होऊन त्यांनी 'समर्थ फुड्स' ची स्थापना केली. संकटाच्या वेळेचं भांडवल न करता ध्येयाचं सोनं करा हा त्यांचा निश्र्चय होता.



लातूरच्या एका साध्या गृहिणीचा छोटासा पाककला प्रयोग आज राज्यभर झळकणाऱ्या ब्रँडमध्ये रूपांतरित झाला आहे. कोविड-१९ च्या भीतीमय काळात सुरू झालेल्या 'समर्थ फुड्स - सुगरणीचे लोणचे' या उद्योगामागे आहे संघर्षावर मात करणारी, धडाडीची समर्थ फुडसच्या महिला उद्योजिकाप्रितम जाधव.

सन २0२0 ची सुरुवात म्हणजे खडतर प्रवास होता. अगदी घरातून एक ब्रँड तयार करण्याची स्वप्न बघत असताना, प्रीतम यांच्यासमोर अनेक आव्हाने उभी होती.नीधी आणि ज्ञानाचा अभाव: त्यांच्याकडे सुरुवातीला केवळ पाच हजार रुपयांचे तुटपुंजे भांडवल होते. कसल्याही प्रकारचे व्यवहारिक ज्ञान नव्हते. अशावेळी अडचणी म्हणजे संधीच असतात हा संवाद आपण सहज उच्चारतो. पण हाच विचार प्रत्यक्षात उतरवणारी स्त्री म्हणजे प्रितम जाधव त्याच 'सुगरणीचे लोणचे' हे फक्त एक उत्पादन नसून प्रत्येक महिलेला स्वतःचं स्वप्न जगण्याची प्रेरणा आहे. प्रत्येक बरणीत एक धैर्याची कहाणी आहे. कठोर परिश्रम, चिकाटी व घरगुती ज्ञानाचे सोने करण्यात कौशल्य आहे! पाहता पाहता या वाटचालीला ५ वर्ष झाली. यानिमीत्ताने हा लेखन प्रपंच

बाजाराचा अभ्यास केला असता त्यांना जाणवलं की, आरोग्यवर्धक (हेल्दी) लोणचे बाजारात योग्य गुणवत्तेचे उपलब्ध नाही. हीच 'अडचण' त्यांच्यासाठी एक 'संधी' ठरली. या मोठ्या कौटुंबिक संकटातून आलेल्या वाईट वेळेला त्यांनी व्यवसायाची मुख्य प्रेरणा बनवले आणि स्वावलंबन व कुटुंबाच्या आर्थिक उभारीचे ध्येय समोर ठेवून ब्रँडची स्थापना केली. 'समर्थ' या नावातच सामर्थ्य आणि आत्मनिर्भरता दडलेली आहे.

५६ चवींचा रंगीबेरंगी संसार

एका महिलेने काहीतरी स्वतःच्या नावाने उभे करावे, हे आजही समाजाला लवकर पचनी पडत नाही. त्यांना सुरुवातीला सगळ्या स्तरातून बेफाम विरोध झाला. पण या विरोधाला न जुगारता त्यांनी आपले काम अविरत चालू ठेवले.

सुगरणीचा प्रवास फक्त पाच हजार रुपयांच्या तुटपुंज्या भांडवलातून आणि कुठल्याही व्यवहारिक ज्ञानाशिवाय सुरू झालेला हा प्रवास आज ५६ प्रकारच्या लोणच्यांच्या उत्पादनापर्यंत पोहोचला आहे. प्रितम यांनी केवळ एक-दोन प्रकारची नव्हे, तर तब्बल ५६ प्रकारच्या लोणच्यांची निर्मिती करून एक नवा विक्रम केला, कारण गरज ही शोधाची जननी असते.त्यांची लोणची सर्वसाधारण मार्केटमध्ये मिळणाऱ्या लोणच्यांसारखी नसून, ती रंगविरहित, रसायनविरहित आणि व्हिनेगर सारख्या प्रिझर्वेटिव्हचा वापर न करता, नैसर्गिक संरक्षक (हिंग, तेल, हळद, खडीसाखर) वापरून बनवलेली आहेत. घरगुती चव - औद्योगिक प्रमाण हाच त्यांच्या यशाचा मंत्र आहे.

आरोग्यवर्धक उत्पादने: मोड आलेले मेथीदाण्यांचे लोणचे (मधुमेह, रक्तदाब नियंत्रणासाठी), गळ लिंबूचे लोणचे (मुतखड्यासारख्या आजारांसाठी) आणि ओल्या हळदीचे लोणचे.नाविन्याची जोड: नॉनव्हेज खाणाऱ्यांसाठी मटण आणि चिकन लोणचे.विश्र्वासाचा आधार: त्यांच्या उत्पादनांमध्ये खाद्यतेलाचा (सरकीचे तेल नव्हे) वापर केला जातो, ज्यामुळे दर्जा नियंत्रण आणि ग्राहकांचा विश्र्वास वाढतो.

'सुगरणीचे लोणचे'ची डिजिटल आणि आर्थिक भरारी

५००० रुपयांपासून सुरुवात आज काही लाखांमध्ये उलाढाल

'समर्थ फुड्स'च्या प्रत्येक लोणच्याच्या बरणीत केवळ चव नाही, तर उद्योजिका प्रितम जाधव यांच्या धैर्याची आणि संघर्षावर मात करण्याच्या जिद्दीची कहाणी दडलेली आहे. ५००० रुपयांच्या तुटपुंज्या भांडवलावर सुरू झालेल्या या घरगुती व्यवसायाला प्रितम यांनी आधुनिक मार्केटिंगची जोड दिली. त्यांनी फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सॲप तसेच ओएनडीसी सारख्या ऑनलाइन प्लॅटफॉर्मचा प्रभावीपणे वापर करून आपला ब्रँड पूर्ण राज्यासह भारतभर पोहोचवला. ग्राहकांमध्ये विश्र्वास आणि आपलेपणाची भावना निर्माण करण्यासाठी त्यांनी स्वतःचा चेहरा लोगोमध्ये वापरला. त्यांच्या घरगुती चवीमुळे आणि या डिजिटल धोरणामुळे आज लोक त्यांना आदराने सुगरण या नावाने संबोधतात, हेच त्यांच्या ब्रँडचे मोठे यश आहे. केवळ घरगुती उत्पादनावर अवलंबून न राहता, त्यांनी डिजिटल युगातील संधीचा फायदा घेऊन आपला उद्योग यशाच्या शिखरावर नेला.

प्रितम जाधव यांच्या कठोर परिश्रमाचे फळ त्यांच्या विक्रीच्या आकडेवारीत स्पष्टपणे दिसून येते. प्रथम वर्षामध्ये जेव्हा त्यांनी सुरुवात केली, तेव्हा फक्त फेसबुक, व्हॉट्सॲपप आणि इंस्टाग्रामच्या माध्यमातून ६,००० किलो इतका लोणच्याचा सेल झाला. दुसऱ्या वर्षी ही विक्री दुप्पट झाली. तिसऱ्या वर्षी एक आउटलेट चालू केल्यानंतर विक्री आणखी वाढली, आणि एका महिन्यात दहा क्विंटल (१,००० किलो) चा सेल झाला. चौथ्या आणि पाचव्या वर्षामध्ये देखील सातत्याने क्विंटलमध्ये विक्रीची ही क्वांटिटी टिकवून ठेवण्यात त्यांना यश आले आहे. यासोबतच सगळ्या प्रकारच्या घरगुती ऑर्डर्स चालू आहेत. महत्त्वाचे म्हणजे, हा उद्योग केवळ स्वतःच्या आर्थिक उलाढालीपुरता मर्यादित न ठेवता, त्या घरून काम करू इच्छिणाऱ्या महिलांना हा स्टॉक विक्रीसाठी देतात, ज्यामुळे त्यांनाही उत्पन्नाचा स्रोत मिळतो. ५००० रुपयांपासून सुरुवात झालेल्या या व्यवसायाची उलाढाल आज काही लाखांमध्ये आहे, हे प्रितम जाधव यांच्या धैर्याचे आणि कुशल व्यवस्थापनाचे प्रतीक आहे.

घरी संसार, बाहेर व्यवसाय यातील



तारेवरची कसरत प्रितम यांनी मोठ्या जिद्दीने केली. सुरुवातीला निधीचा अभाव आणि सामाजिक विरोधाचा संघर्ष होता, पण त्यांनी हार मानली नाही. प्रितम जाधव केवळ उद्योजकच नाहीत, तर त्या महिला सक्षमीकरणाचे जिवंत उदाहरण आहेत. त्यांनी २५० हून अधिक महिलांना उद्योगाला प्रवृत्त केले आहे. त्या म्हणतात, माझं यश म्हणजे अनेक महिलांची नवी सुरुवात. गरजू महिलांना रोजगार मिळावा या हेतूने त्या काम देतात. कौटुंबिक संकटातून आलेल्या धक्क्यांमधून उभारी घेत, मी करू शकते! हे जीवनसूत्र त्यांनी सिद्ध केले.

प्रितम जाधव यांचे पुढील ध्येय स्पष्ट आहे - उत्पादनांची गुणवत्ता टिकवून ठेवणे आणि प्रत्येक शहरात 'सुगरणीची' एक शाखा असावी. तसेच, महिला उद्योजकांसाठी प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याची त्यांची योजना आहे, जेणेकरून ग्रामीण महिलांना रोजगाराच्या संधी मिळतील.त्यांच्या आयुष्याची कहाणी सांगते की, साहस, संयम, सातत्य आणि सचोटी या गुणांनी कोणतीही स्त्री परिस्थितीवर मात करू शकते.प्रत्येक बरणीत एक धैर्याची कहाणी आहे. कठोर परिश्रम, चिकाटी व घरगुती ज्ञानाचे सोने करण्यात कौशल्य आहे! प्रितम जाधव राज्यातील प्रत्येक शहरात शाखा उघडण्याची योजना, महिला उद्योजक प्रशिक्षण केंद्राची उभारणीसह ग्रामीण महिलांना अधिक रोजगाराच्या संधी देण्याचे भविष्यातील ध्येय आहे. या निमीत्ताने 'सुगरणीचे लोणचे' हा फक्त एक ब्रँड नाही; ती आहे घरगुती बुद्धी, मेहनत आणि मराठी बाईच्या जिद्दीची कहाणी..! असेच म्हणावे लागेल

**संपर्कासाठी - समर्थ फुडसच्या**
**महिला उद्योजिका प्रितम जाधव**
**भ्रमणध्वनी - ८६९८७९६९००**




## मालवेअर किंवा व्हायरस, ज्यामुळे होते जास्त नुकसान दोघांमध्ये काय आहे फरक.. ते समजून घ्या

मालवेअर आणि व्हायरस बद्दल लोकांमध्ये खूप संभ्रम आहे, असे बरेच लोक आहेत, जे दोघांना एकच गोष्ट मानतात, पण प्रत्यक्षात तसे नाही. मालवेअर आणि व्हायरस हे दोन्ही एकमेकांपासून खूप वेगळे आहेत, आज आम्ही तुम्हाला या दोघांमध्ये काय फरक आहे आणि कोणता सर्वात जास्त नुकसान घडवतो याबद्दल माहिती देणार आहोत.

मोबाइल फोनपासून लॅपटॉपपर्यंत, मालवेअर आणि व्हायरस या दोन्हींचा धोका प्रत्येक उपकरणामध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येतो. यामुळेच तुम्हा लोकांना या दोघांमध्ये काय फरक आहे याची जाणीव असावी

व्हायरस म्हणजे काय

व्हायरस म्हणजे काय या प्रश्नाचे उत्तर जाणून घेण्यापूर्वी, व्हायरसचे पूर्ण रूप काय आहे हे जाणून घेणे तुमच्यासाठी महत्त्वाचे आहे

तुमच्या लॅपटॉप किंवा फोनमध्ये व्हायरस आल्याचे तुम्ही अनेकदा ऐकले असेल, पण तुम्हाला या शब्दाचा अर्थ माहित आहे का पाच अक्षरांनी बनलेल्या या शब्दाचा अर्थ सीज अंतर्गत महत्त्वपूर्ण माहिती संसाधने.

व्हायरस देखील एक प्रकारचा मालवेअर आहे, परंतु त्याचे कार्य फाइल किंवा डिव्हाइसला संक्रमित करणे आहे. जेव्हा जेव्हा आपण कोणत्याही थर्ड पार्टीच्या वेबसाइटवरून कोणताही व्हिडिओ किंवा अझ्ख फाइल डाउनलोड करतो, तेव्हा डिव्हाइसमध्ये व्हायरसचा प्रवेश होण्याचा धोका वाढतो.

डाउनलोड केल्यानंतर, तुम्ही डिव्हाइसवर कोणतीही फाइल उघडताच किंवा चालवताच, फाइलमध्ये लपलेला व्हायरस तुमच्या डिव्हाइसमध्ये वणव्यासारखा पसरतो.

मालवेअर म्हणजे काय आणि ते कसे नुकसान करते

व्हायरसनंतर आता आम्ही तुम्हाला मालवेअर म्हणजे काय आणि ते तुमचे नुकसान कसे करू शकते याबद्दल माहिती देऊ.

तुमच्या माहितीसाठी आम्ही तुम्हाला सांगतो की धोकादायक सॉफ्टवेअरसाठी मालवेअरचा वापर केला जातो. हॅकर्स किंवा तुम्ही म्हणू शकता की स्कॅमर हे धोकादायक सॉफ्टवेअर डिझाइन करतात, कारण या मालवेअरच्या मदतीने, दूरवर बसूनही कोणत्याही डिव्हाइसवर अनधिकृत प्रवेश घेता येतो.

मालवेअरच्या मदतीने, स्कॅमर किंवा हॅकर्स दूरवर बसलेल्या कोणत्याही डिव्हाइसला अगदी सहजपणे संक्रमित करू शकतात. या धोकादायक सॉफ्टवेअरचा वापर डिव्हाइसचे नुकसान करण्यासाठी आणि कोणत्याही डिव्हाइसवरून पेमेंट तपशील, कार्ड तपशील आणि बँकिंग तपशील इत्यादीसारख्या वैयक्तिक माहितीची चोरी करण्यासाठी केला जातो.

अधिक धोकादायक व्हायरस किंवा मालवेअर कोणता

हा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण होतो की मालवेअर आणि व्हायरसमध्ये सर्वात धोकादायक कोणता यात कमी-जास्त असे काही नाही, दोन्ही धोकादायक आहेत. जर यापैकी काही तुमच्या डिव्हाइसमध्ये आले, तर समजून घ्या की ते तुमच्यासाठी कठीण होऊ शकते.

व्हायरस आणि मालवेअर कसे टाळायचे

ऑपरेटिंग सिस्टम उर्फ डिव्हाइस सॉफ्टवेअर नेहमी अपडेट ठेवा.

ॲंटी-मालवेअर आणि ॲंटी-व्हायरससारखे सॉफ्टवेअर वापरा.

कोणत्याही अज्ञात ईमेल किंवा संलग्नक वर क्लिक चूकुनही क्लिक करु नका.

सार्वजनिक वाय-फाय नेटवर्क फक्त मोफत मिळण्यासाठी वापरू नका.

## शेतकऱ्यांना दिलासा देणारी 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना'

जागतिक हवामान बदल आणि अनियमित पर्जन्यमान यामुळे शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीचा सामना सातत्याने करावा लागत आहे. अशावेळी शेतकरीवर्गाला मदतीचा हात देऊन त्यांना दिलासा देण्यासाठी राज्यातील ७.५ एचपीपर्यंतच्या शेती पंप ग्राहकांना मोफत वीज देण्यासाठी 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना-२०२४' राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यात मार्च २०२४ अखेर ४७ लाख ४१ हजार इतके कृषी पंप ग्राहक असून या ग्राहकांना महावितरण कंपनीमार्फत वीज पुरवठा करण्यात येतो. एकूण ग्राहकांपैकी १६ टक्के कृषीपंप ग्राहक असून ऊर्जेच्या एकूण वापरापैकी सुमारे ३० टक्के ऊर्जेचा वापर कृषी क्षेत्रासाठी होतो. कृषी ग्राहकांचा सध्याचा एकूण वार्षिक वीज वापर ३९ हजार २४६ दश लक्ष युनिट आहेत. प्रामुख्याने या विजेचा वापर कृषी पंपास वीज पुरवठा करण्यासाठी होतो. सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण राज्यात कृषी वाहिन्यांवरील शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना रात्रीच्या काळात १०८ तास किंवा दिवसा ८ तास थ्री फेज विजेची उपलब्धता चक्राकार पद्धतीने करण्यात येते.

जून २०२४ महिन्यात झालेल्या पावसाळी अधिवेशनात उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पीय भाषणात 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना-२०२४' राबविण्याची घोषणा केली होती. या योजनेद्वारे शेतकऱ्यांवर येणाऱ्या वीजबिलाचा भार उचलण्याचे शासनाने ठरविले असून राज्यातील ४४ लाख ३ हजार शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपांना पूर्णत: मोफत वीज पुरविण्यात येणार आहे. याकरीता १४ हजार ७६० कोटी रुपये अनुदान स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महावितरण कंपनीच्या कृषी ग्राहकांना मदत करण्याच्यादृष्टीने व त्यांची थकबाकी वाढू न देण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना-२०२४ राबविण्यात येत आहे.

ही योजना ५ वर्षासाठी राबविण्यात येत असून त्याचा कालावधी एप्रिल २०२४ ते मार्च २०२९ पर्यत आहे. मात्र ३ वर्षाच्या कालावधीनंतर सदर योजनेचा आढावा घेवूनच पुढील कालावधीत योजना राबविण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे. राज्यातील ७.५ एचपीपर्यत शेतीपंपाचा मंजूर भार असलेले सर्व शेतीपंप ग्राहक या योजनेचा लाभ घेण्यास पात्र राहतील.

योजनेच्या अंमलबजावणीची पद्धत:

'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना' ही योजना महावितरण कंपनीतर्फे राबविण्यात येते. शासनास विद्युत अधिनियम २००३, कलम ६५ अन्वये कोणत्याही ग्राहकांना अथवा ग्राहक वर्गवारीला अनुदान देवून त्यानुसार अनुदानीत वीज दर लागू करण्याचे अधिकार आहेत. त्यानुसार वीज बिल माफ केल्यानंतर सदर वीजदर सवलतीपोटी रक्कम शासनाकडून महावितरण कंपनीला अग्रीम स्वरुपात वर्ग करण्यात येत आहे.

सध्या देण्यात येणारी वीजदर सवलत ६ हजार ९८५ कोटी रुपये अधिक वीज बिल माफीनुसार सवलत रुपये ७ हजार ७७५ कोटी रुपये असे वार्षिक वीजदर सवलतीसाठी प्रतिवर्षी १४ हजार ७६० कोटी रुपये शासनाकडून महावितरण कंपनीला अदा करण्यात येणार आहे. मागेल त्याला सौर कृषीपंप देण्याचे धोरण शासनाकडून ठरविण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी वीजेची सुलभतेने उपलब्धता होऊ शकेल.

सुनील काकडे, मुख्य अभियंता, महावितरण पुणे परिमंडल, पुणे :

'राज्य शासनाने जाहीर केलेल्या मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना २०२४ नुसार ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यतच्या शेतीपंपाना मोफत वीजपुरवठा करण्यात येत आहे. पुणे जिल्ह्यात एकूण ३ लाख २९ हजार ४८८ शेतीपंप आहेत. त्यापैकी ७.५ अश्वशक्तीपर्यतच्या एकूण २ लाख ८४ हजार १९८ शेतीपंपधारक शेतकऱ्यांना या मोफत वीज योजनेचा लाभ होत आहे.'

विकास किसन कापडी, मु. जारकरवाडी, पो. पारगांव, ता. आंबेगाव: आमचे ३ एचपी व ५ एचपीचे दोन शेतीपंप कनेक्शन आहेत. गेल्या दीडएक वर्षापासून आमची लाईट बिलाची चिंता मिटली आहे. पूर्वी दर तीन महिन्याला बील यायचे. ते भरण्यासाठी पैशाची जुळवणी करताना दमछाक व्हायची. योजनेबद्दल सरकारचे धन्यवाद. तसेच सरकारने ही योजना कायमस्वरुपी सुरु ठेवावी.

सुनिल अर्जुन करंडे, काठापूर बु., ता. आंबेगाव:

माझे ५ एचपीचे कनेक्शन आहे. मागील वर्षापासून आम्हाला शेतीचे बील येणे सरकारच्या बळीराजा मोफत योजनेमुळे बंद झाले आहे. या योजनेबद्दल मी समाधानी असून, सरकारचा आभारी आहे. दिवसा वीज देण्यासाठीही सरकारचे प्रयत्न सुरु आहेत.

# लिंबू पाणी प्यायल्यामुळे वजन कमी होते का ? वाचा सविस्तर...

बऱ्याच लोकांना आपला दिवस एक ग्लास लिंबू सरबताने सुरू करणे आवडते.



लिंबाचे पाणी शरीराला डिटॉक्स करते आणि पचन सुधारते असा विश्वास आहे. पण तज्ज्ञांचे मत आहे की, या दाव्यात तथ्य नाही. गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्टच्या मते, लिंबू पाण्याचे योग्य प्रकारे सेवन करणे नक्कीच फायदेशीर ठरू शकते, परंतु त्याचा 'मॅजिक पोशन' म्हणून विचार करणे योग्य नाही. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की लिंबू पाणी शरीराला हायड्रेटेड ठेवण्यासाठी आणि पचनास मदत करण्यासाठी उपयुक्त आहे, परंतु ते थेट शरीरातून विषारी पदार्थ काढून टाकत नाही किंवा थेट चरबी कमी करू शकत नाही.

लिंबू पाणी पिण्याचे फायदे :

१. लिंबू पाणी प्यायल्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. २. हायड्रेशन आणि पचनसाठी हे एक चांगले पेय आहे. ३. त्याची आंबट चव ज्यांना साधे पाणी पिणे आवडत नाही त्यांच्यासाठी साध्या पाण्याचा एक चांगला पर्याय बनवते. ४. लिंबाच्या रसातील आम्ल पोटाला पाचक एंजाइम तयार करण्यास मदत करू शकते. ५. लाळेच्या उत्पादनास देखील उत्तेजन देते.

प्रत्येक व्यक्तीमध्ये भिन्न फायदा :

लिंबू सरबताचा फायदा प्रत्येक व्यक्तीमध्ये भिन्न असू शकतो. लिंबू सरबताचे प्रमाण आणि वेळ लक्षात घेणे ही सर्वात महत्वाची गोष्ट आहे. दिवसातून फक्त एकदा किंवा दोनदा लिंबू सरबत पिणे हिताचे ठरू शकते.


लिंबाच्या पाण्यामुळे थेट वजन कमी होते ?

लिंबाच्या पाण्यामुळे थेट वजन कमी होते असा एक सामान्य समज आहे, परंतु तज्ज्ञ या गोष्टीशी सहमत नाहीत. हे पेय प्यायल्याने आपल्याला पोट भरल्यासारखे वाटू शकते आणि जर आपण ते गोड पदार्थाशिवाय प्यायले तर ते आपल्यातल्या एकूण कॅलरीचे प्रमाण कमी करू शकते. तज्ज्ञांनी यावर जोर दिला आहे की हे पेय चरबी कमी करणारे नाही. ज्या लोकांना आधीपासूनच ॲसिडीटी , जठराची सूज किंवा अल्सर यासारख्या समस्या आहेत त्यांनी लिंबाचे पाणी पिताना सावधगिरी बाळगली पाहिजे. लिंबामधील सायट्रिक ॲसिड पोटाच्या आतील अस्तराला त्रास देऊ शकते. ज्यांना आधीच आंबटपणा किंवा छातीत जळजळ होण्याची समस्या आहेत त्यांच्यासाठी लिंबाचे पाणी हे नुकसानकारक ठरू शकते.

# थंडीत डोळ्यांची काळजी घ्या...

ठाणे : थंडी वाढणार असल्याचे संकेत हवामान खात्याने दिले असून या काळात शरीरासोबतच डोळ्यांचीही विशेष काळजी घेणे अत्यावश्यक आहे, असा सल्ला नेत्रतज्ज्ञांनी दिला आहे. थंड वारे, कोरडी हवा आणि स्क्रीनसमोर वाढलेला वेळ या सगळ्यांचा परिणाम थेट डोळ्यांवर होत असून डोळे कोरडे पडणे, लालसरपणा, चुरचुरणे आणि दृष्टी धूसर होणे या तक्रारी वाढू शकतात. हिवाळ्याच्या मोसमात अवकाळी पावसाने हजेरी लावली असल्यामुळे थंडी काहीशी लांबली आहे. मात्र थंडीच्या दिवसात डोळ्यांची काळजी तितकीच महत्त्वाची आहे. या काळात हवेतील आर्द्रता कमी होते. त्यामुळे डोळ्यांचा नैसर्गिक ओलावा कमी होतो. यासाठी घरात ह्यूमिडिफायर वापरणे, पुरेसे पाणी पिणे आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने आर्टिफिशियल टिअर्स (कृत्रिम अश्रू) वापरण्याचा सल्ला दिला जात आहे.

कोरड्या हवेमुळे डोळ्यांचे आरोग्य बिघडू शकते.''थकवा आणि झोपेअभावी डोळ्यांत कोरडेपणा येतो. दररोज किमान सात ते आठ तासांची झोप घेतल्यास डोळ्यांना विश्रांती मिळते



आणि ते ताजेतवाने राहतात. डोळ्यांत खाज, लालसरपणा, पाणी येणे किंवा दृष्टी धूसर होणे या तक्रारी वाढल्यास स्वउपचार न करता नेत्रतज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.'' - डॉ. शुभांगी अंबाडेकर (नेत्रतज्ज्ञ सिव्हिल रुग्णालय ठाणे)

काय काळजी घ्याल :बाहेर पडताना डोळ्यांवर थंड वाऱ्याचा आणि धुळीचा थेट परिणाम होतो. त्यामुळे सनग्लासेस किंवा संरक्षणात्मक चष्मा वापरणे आवश्यक आहे. हे डोळ्यांना थंडी, धूळ आणि तीव्र प्रकाशापासून बचाव करत असल्याची माहिती सिव्हिल रुग्णालयाच्या नेत्रतज्ज्ञ डॉ. शुभांगी अंबाडेकर यांनी दिली.गाजर, पालक, बदाम, अक्रोड आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स असलेले पदार्थ डोळ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत.

व्हिटॅमिन ए, सी आणि ई यांचा पुरवठा केल्यास दृष्टीसंबंधी त्रास कमी होऊ शकतो.

प्रत्येक २० मिनिटांनी २० सेकंद स्क्रीनपासून दूर पाहण्याचा सल्ला दिला जातो. असे केल्यास डोळ्यांवरील ताण कमी होतो.



# सकाळी रिकाम्या पोटी पपई खाल्ल्याने

## चला जाणून घ्या फायदे.

पपई पचनसंस्थेसाठी वरदान

पपई खाणे हे पचनसंस्थेसाठी वरदान मानले जाते. त्यात पपेन नावाचे एंजाइम असते, जे प्रथिने पचवण्यास मदत करते. शिवाय, पपईतील फायबर बद्धकोष्ठतेपासून मुक्त होण्यास मदत करते. दररोज पपई खाल्ल्याने अपचन, गॅस आणि आम्लता यासारख्या पोटाच्या समस्या दूर होतात.

**कोणी चिया सीड्स खाणे टाळावे ?**

पपई रोगप्रतिकारक शक्ती वाढवते

आरोग्य तज्ञांच्या मते, दररोज पपई खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढते. पपई हे व्हिटॅमिन सीचा एक उत्तम स्रोत आहे. मध्यम आकाराच्या पपईमध्ये संत्र्यापेक्षा तीन पट जास्त व्हिटॅमिन सी असते.व्हिटॅमिन सी शरीराची रोगांशी लढण्याची क्षमता मजबूत करते, ज्यामुळे सर्दी आणि संसर्गाशी लढण्यास मदत होते.

# मानसिक आरोग्य प्राधिकरणे: कायदा लागू, काम कागदावरच!


मुंबई : देशात मानसिक आरोग्यविषयक जागरूकता वाढवण्याचे प्रयत्न मागील काही वर्षांत सुरू असले तरी, या क्षेत्रातील सर्वात महत्त्वाचा पाया असलेल्या राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरणांची कामगिरी मात्र अत्यंत मर्यादित राहिली आहे. २०१७ साली लागू झालेल्या मानसिक आरोग्य कायद्यानुसार सर्व राज्यांनी स्वतंत्र प्राधिकरणे, निरीक्षण मंडळे आणि उपचार केंद्रांची नोंदणी व्यवस्था उभारायची होती. मात्र आठ वर्षांनंतरही बहुतांश राज्यांत ही यंत्रणा केवळ कागदावरच कार्यरत असल्याचे स्पष्ट होत आहे.

आरोग्य मंत्रालयाच्या ताज्या आकडेवारीनुसार, देशातील २८ राज्यांपैकी सुमारे निम्म्या राज्यांनीच आपली मानसिक आरोग्य पुनरावलोकन मंडळे (मेंटल हेल्थ रिव्ह्यू बोर्ड्स) कार्यान्वित केली आहेत. काही राज्यांत अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती प्रलंबित असून, काहींकडे कार्यालयीन व प्रशासकीय साधनसामग्रीच नाही. परिणामी, मानसिक आजारग्रस्त नागरिकांना कायद्यानुसार मिळणाऱ्या हक्कांची अंमलबजावणी कागदावरच अडकली आहे.सुप्रीम कोर्टाने नुकतेच या संदर्भातील एका याचिकेची सुनावणी करत राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाला थेट देखरेखीचे निर्देश दिले. मानसिक आरोग्य कायद्याची अंमलबजावणी झाल्याचे सांगणे पुरेसे नसून प्रत्यक्षात त्या यंत्रणा नागरिकांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

मानसिक आरोग्य सेवा पुरवण्यासाठी आवश्यक तज्ज्ञांची टंचाईही गंभीर आहे. देशात केवळ ०.७५ मानसोपचारतज्ज्ञ प्रति एक लाख लोकसंख्या एवढे प्रमाण असून, जागतिक आरोग्य संघटनेच्या शिफारसीपेक्षा हे प्रमाण निम्म्याहूनही कमी आहे. मनोवैज्ञानिक, सामाजिक कार्यकर्ते, आणि प्रशिक्षित काउन्सिलर या सर्वांचा तुटवडा सर्वच राज्यांमध्ये जाणवतो.मानसिक आरोग्यासाठी केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या अर्थसहाय्याचाही हिस्सा अत्यल्प आहे. २०२६ मध्ये शनी महाराज करणार तीन वेळा नक्षत्र गोचर, 'या' तीन राशींचे आयुष्य रातोरात बदलणार, सुख-समृद्धी अनब बँक बॅलन्स झपाट्याने वाढणार नेहीरप चरावरपळ डशिशलह: झोहरान ममदानी यांचे विजयानंतर डोनाल्ड ट्रम्प यांना चार शब्दात प्रत्युत्तर; म्हणाले, ङ्गमुस्लीम आहे म्हणूनःङ्घ भारतीय महिला संघाने घेतली पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट, वर्ल्ड चॅम्पियन टीम इंडियाने पंतप्रधानांना दिलं

२०२४-२५ च्या अर्थसंकल्पात एकूण आरोग्य खर्चातील केवळ ०.३ टक्के निधी मानसिक आरोग्यासाठी राखीव ठेवण्यात आला.'जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम' सध्या ७६७ जिल्ह्यांपर्यंत पोहोचला असला तरी, ग्रामीण भागातील सेवा अपुऱ्या आहेत. टेली मानस या दूरध्वनी मार्गे समुपदेशन देणाऱ्या योजनेने थोडा दिलासा दिला असला तरी प्रत्यक्ष उपचार, पुनर्वसन आणि सामाजिक पुनर्स्थापना यांसारख्या बाबतीत मोठी तफावत कायम आहे. २०१७ साली लागू झालेल्या मानसिक आरोग्य कायद्यांतर्गत प्रत्येक राज्याने मानसिक आरोग्य रुग्णालयांची नोंदणी, अधिकारांचे संरक्षण आणि पुनरावलोकन मंडळांची स्थापना करण्याची जबाबदारी घेतली. या कायद्यानुसार मानसिक आजार हा आरोग्याचा अविभाज्य भाग मानला जातो आणि त्यासाठी विमा संरक्षणही अनिवार्य करण्यात आले. मात्र प्रत्यक्षात, बहुतांश राज्यांत या तरतुदींची अंमलबजावणी विलंबित राहिली आहे.

मानसिक आरोग्यविषयक कायदे आणि योजना तयार झाल्या असल्या तरी, प्राधिकरणांचे कामकाज नागरिकांना दिसत नाही. उपचारकेंद्रांची नोंदणी, तक्रार निवारण मंडळे किंवा निरीक्षण पथक यांची कार्यक्षम ता



जवळपास शून्य असल्याचे मानसोपचारतज्ज्ञांचे म्हणणे आहे.प्राधिकरणांची उपस्थिती कागदावर असून ती प्रत्यक्षात नागरिकांपर्यंत पोहोच नाही असेही तज्ज्ञांचे मत आहे. अनेक राज्यांनी प्राधिकरणे केवळ दाखवण्यासाठी स्थापन केली असून प्रत्यक्षात त्यांच्याकडे मनुष्यबळ, बजेट किंवा अधिकार नसल्याने नागरिकांना अपेक्षित मदत मिळत नाही. परिणामी मानसिक आरोग्य हे 'अदृश्य संकट' बनलेले असतानाच देशातील प्राधिकरणांची निष्क्रियता ही काळजी वाढवणारी बाब आहे. केंद्र आणि राज्य सरकारांनी या संस्थांना केवळ कागदी अस्तित्व न ठेवता प्रत्यक्ष कामकाजात आणणे हेच आता सर्वात मोठे आव्हान ठरत आहे.

अलीकडेच म्हणजे २८ ऑक्टोबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने एका खटल्याच्या अनुषंगाने याबाबत महत्वपूर्ण निर्णय दिला आहे.उत्तर प्रदेशातील बदायूं येथील 'श्रद्धा-आधारित' आश्रमात साखळदंडात बांधलेल्या मानसिक आजारी कैद्यांच्या अवस्थेवर आधारित याचिकेच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने हा आदेश दिला आहे. देशभरातील केंद्रीय आणि राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरणांचे योग्य कार्य आणि देखरेख सुनिश्चित करण्याची मागणी करणारी याचिका राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे हस्तांतरित केली. न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने हा आदेश दिला.ही याचिका २०१८ मध्ये अधिवक्ता गौरव कुमार बन्सल यांनी दाखल केली होती. त्यांनी उत्तर प्रदेशातील बदायूं येथील एका 'श्रद्धा-आधारित' आश्रमात साखळदंडात बांधलेल्या मानसिक आजारी कैद्यांची दयनीय अवस्था न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली होती.

त्यावेळी बन्सल यांनी २०१७ च्या मानसिक आरोग्य कायद्याच्या तरतुदीनुसार मानसिक आजाराने ग्रस्त व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी स्वतंत्र केंद्रीय आणि राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरणांची स्थापना करण्याची मागणी केली होती. तसेच या प्राधिकरणांसाठी आणि मानसिक आरोग्य पुनरावलोकन मंडळांसाठी स्वतंत्र निधीची तरतूद करण्याचीही मागणी केली होती.

आरोग्य मंत्रालयाने नंतर न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करून या प्राधिकरणांची अधिसूचना जारी झाल्याचे सांगितले. न्यायालयाने निरीक्षण केले की 'केंद्रीय मानसिक आरोग्य प्राधिकरण तसेच राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी स्थापन केलेली प्राधिकरणे कार्यरत असल्यामुळे न्यायाच्या हितासाठी या याचिकेवर एनएचआरसीने देखरेख ठेवावी आणि या प्राधिकरणांचे म्हणणे ऐकल्यानंतर आवश्यक दिशानिर्देश द्यावेत' असा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आहे. न्यायालयाने या याचिकेला एनएचआरसीकडे 'तक्रार' म्हणून पुनर्नंबरित करून कायद्यानुसार देखरेख आणि निकाली काढण्यासाठी पाठवण्याचे निर्देश दिले. तसेच या प्राधिकरणांनी प्रभावीपणे कार्य करावे यासाठी आवश्यक आदेश जारी करण्याचे निर्देश एनएचआरसीला दिले.

## मुरुमे टाळण्यासाठी 'हे' करा — डॉक्टर टीप्स



'मुरुमं..' हा शब्द ऐकल्यावर अनेकांच्या कपाळावर आठ्या येतात. इंटरनेटवर 'ॲक्ने' अर्थात मुरमं, तारुण्यपिटिकांच्या समस्येबद्दलची खरीखोटी माहिती दिलेली असते. जुन्याजाणत्यांच्या अनुभवांपासून ते मैत्रीपूर्ण सल्ल्यांपर्यंत, केमिस्टकडे मिळणाऱ्या औषधांपेक्षा परिणामकारक असल्याचा दावा करणाऱ्या घरगुती उपचारांपासून ते नैसर्गिक उपचारांपर्यंत साऱ्यांचा भडिमार होताना दिसतो. त्यामुळे आपल्या 'मुरुमां'वरील उपचारांना सुरुवात करण्यापूर्वी या समस्येशी जोडलेल्या गैरसमजांपासून स्वत:ला दूर नेणे आवश्यक आहे.

'मुरुमां'शी संबंधित काही सर्वसाधारण मिथके आणि या गोष्टी कपोलकल्पित का आहेत, यामागची कारणे पुढीलप्रमाणे -

मिथक : चेहरा जास्त वेळा धुतल्याने 'मुरुमां'चे शुद्धीकरण होते वास्तव: मुरुमं ही धुळीमुळे उद्भवत नाहीत. त्वचेवरील छिद्रे धूळ बसल्याने बाहेरून बंद होतात, त्यामुळे मुरुमे उद्भवतात.**(क्रमशः)**....

## विनोद




गुरूजी : सांग असत्यवादी मोठा की सत्यवादी?

शिष्य : असत्यवादी.

गुरूजी : काहीतरी भलतंच कसं काय?

शिष्य : सत्यवादी चार अक्षरी शब्द आहे. असत्यवादी एका अक्षराने मोठा आहे.

## संदेश

Babu apni girlfriend se- darling kal ghar par aa jana koi bhi nahi hoga!

Jab ladki ghar par aati hai to sachmuch koi nahi tha.

Ladka- kya me tumhara hath tham lu?

Ladki – No thanks ! ye itna bhari nahi he!!

## सुविचार



जागृतावस्थेतील व्याधींना निद्रा हेच एकमेव औषध.


**-सर्वेंटिस**

**संस्कृत सुभाषित**

**जीवन्तोऽपि मृता: पञ्च व्यासेन परिकीर्तिता: । दरिद्रो, व्याधितो, मूर्ख:, प्रवासी नित्यसेवक: ॥**

अर्थ : दरिद्री, रोगी, मूर्ख, प्रवासी आणि वेठबिगार कामगार हे पाचजण जिवंत असून मेल्यासारखे आहेत अशी व्यासोक्ती आहे.

# मनोरंजक महाशब्दकोडे



**आडवे शब्द**

१. रावसाहेब रामराव – अर्थात गृहमंत्री आबांचे नाव
६. पोलिसांवरील अधिकारी
९. ही धरून लगडी घालतात
११. छिद्र, जखम
१२. जय पराजय
१४. घोंगड्या विणणारी जमात
१६. मोठा हातोडा
१७. रम्य दृश्य
१९. धमनी
२१. मला
२४. उपहास
२५. शरीर
२७. खरकट्याचा ढीग
२९. श्रीकृष्णाचे एक नाव
३१. वचक, भीती
३२. हिंदीत शरीर
३३. बारीक झिणझिण
३५. वाक्बगार
३७. अभिमन्यूला ठार मारणारा
३९. फायदा
४०. दहा अब्ज ही संख्या
४१. लाज
४३. रसाळ
४५. मूळ अर्थ शहाणा, सुंदर आणि प्रचलित अर्थ शहरी
४६. जाणे-येणे, वहिवाट
४८. पायताण
४९. सीतेची जुळी मुले
५१. खदक
४३. म--- रे झूठ मत बोलो, खुदा के पास जान हैफ
५४. पौराणिक आयुध
५५. ओझी उचलणारा
५७. सत्त्व
५९. जोखीम
६१. वाई-महाबळेश्वरमधील प्रसिद्ध घाट
६२. पोहणे
६४. गवताचे रुंद पान
६५. निवासस्थान
६६. मत देणारा
६८. उत्पन्नातील सरकारी हिस्सा
६९. भित्रा, पळ काढणारा
७०. कुलीन
७२. जाणकार
७५. पालव
७७. ढीग
७९. रक्तवाहिन्या
८०. जमीनदार
८१. कमीतकमी, निदान एवढे तरी!

**उभे शब्द**

१. संरक्षण
२. बाहेरच्या विरूद्ध
४. धरणातील पाणीसाठ्याचा प्रदेश
५. छोटी
६. सैनिक
७. जपणे
८. आवड
९. घट्ट, तणावाची स्थिती
१०. उष्ण
१३. प्रजा
१५. दृष्टीभेट
१६. गर्द, गच्च
१८. वेगाने
२०. शीतपेय
२२. सोनिया गांधी यांचे दिल्लीतील निवासस्थान या मार्गावर आहे
२३. खरे तर हे काही जेवण नव्हे!
२६. सापाला कधी धाकला म्हणू नये आणि याला आपला!
२८. माज
३०. आवाज, गोंगाट
३४. डोळ्यात तेल घालून करण्याचे काम
३५. विनाश
३६. राजालाही इथे नतमस्तक व्हावे लागते
३८. मृत्यूचा राजा
४१. संभवनीय
४२. पारशी जनतेचा वर्षारंभ दिन
४४. नूतन
४७. माळी, बागवान
५०. काढलेली खोडी
५२. जाडसर पीठ
५३. सर्व
५४. मारुती, भीम
५५. हिंदुस्थानी
५६. उपस्थित
५८. उत्सवाचे दिवस
६०. च्या बद्दल
६३. तरतूद
६४. साडी
६५. जात्याचा आवाज
६६. मधुमक्षिका
६७. शील, उदारता
६८. गव्हाचे बारीक पीठ
६९. पुन्हा
७१. नवरा
७३. नवरत्नांपैकी एक
७४. खेडे
७६. फितुरी
७७. भूपती
७८. माळ, हार

**आडवे उत्तर**

१.आर.आर. पाटील ६.फौजदार ९.तंगडी ११.क्षत १२.हारजीत १४.सनगर १६.घण १७.विलोभनीय १९.नस २१.मज २४.टर २५.तन २७.रमराट २९.दामोदर ३१.धाक ३२.बदन ३३.रवरव ३५.सराईत ३७.जयद्रथ ३९.लाभ ४०.खर्व ४१.शरम ४३.रसवान ४५.नागर ४६.राबता ४८.वहाण ४९.लवकुश ५१.चर ५३.सजन ५४.गदा ५५.भारवाहक ५७.कस ५९.जबाबदारी ६१.पसरणी ६२.जलतरण ६४.पात ६५.घर ६६.मतदार ६८.आयकर ६९.पळपुटा ७०.घरंदाज ७२.माहितगार ७५.पदर ७७.रास ७९.शीरा ८०.वतनदार ८१.गेला बाजार

**उभे उत्तर**


१.रक्षण ३.आत ४.पाणलोट ५.लहानी ६.फौजी ७.जतन ८.रस ९.तंग १०.गरम १३.रयत १५.नजरा-नजर १६.धनदाट १८.भरधाव २०.सरबत २२.जनपथ २३.उदरभरण २६.नवरा २८.मद ३०.रव ३४.रखवालदारी ३५.सर्वनाश ३६.ईश्वरचरणी ३८.यमराज ४१.शक्य ४२.नवरोज ४४.नव ४७.बनकर ५०.कुरापत ५२.रवा ५३.सकल ५४.गदाधर ५५.भारतीय ५६.हजर ५८.सणवार ६०.बाबत ६३.तजवीज ६४.पातळ ६५.घरघर ६६.मधमाशी ६७.दानत ६८.आटा ६९.परत ७१.दादला ७३.हिरा ७४.गाव ७६.दगा ७७.राजा ७८.सर



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### हार्दिक पांड्या आणि गर्लफ्रेंड माहिका शर्मा यांचा 'कार वॉश' रोमांस



मुंबई–पत्नी नताशा स्टॅनकोविक हिच्यासोबत घटस्फोट घेतल्यानंतर हार्दिक पांड्या पुन्हा एकदा प्रेमात पडल्याची चर्चा आहे. गेल्या काही दिवसांपासून क्रिकेटर हार्दिक मॉडेल माहिका शर्मासोबत रिलेशनशिपमध्ये असल्याची जोरदार चर्चा आहे. या दोघांना नुकतेच मालदीवला एकत्र जाताना विमानतळावर पाहण्यात आले होते. हार्दिक पांड्याच्या या नव्या नात्यामुळे त्याचे खासगी आयुष्य पुन्हा एकदा प्रसारमाध्यमांमध्ये चर्चेचा विषय बनले आहे.नुकताच हार्दिक पांड्याने आपला वाढदिवस माहिका शर्मा हिच्यासोबत मालदीवमध्ये साजरा केला. हार्दिक पांड्या आणि माहिका शर्मा यांचे वाढदिवसाचे काही खास फोटो सोशल मीडियावर शेअर करण्यात आले

**

### काव्या मारनचा मोठा निर्णय! सनरायझर्स हैदराबादच्या मालकिणीने बदलले टीमचे नाव; जाणून घ्या नवीन ओळख

मुंबई–आयपीएल मध्ये आपल्या एलिगन्स आणि स्मितहास्याने चर्चेत राहणारी काव्या मारन पुन्हा एकदा हेडलाइन्समध्ये आहे. पण यावेळी कारण घ्ङ्ख नाही, तर इंग्लंडची 'द हंड्रेड' लीग. काव्याने या लीगमधील आपल्या टीमचं नाव बदललं आहे. आधी 'नॉर्दर्न सुपरचार्जर्स' म्हणून ओळखली जाणारी ही टीम आता 'सनरायझर्स लीड्स' नावाने खेळणार आहे.

११५५ कोटींची डील, आणि नवीन ओळख

चेन्नईच्या सन ग्रुपचे प्रमुख कलानिधी मारन आणि कंपनीच्या डायरेक्टर काव्या मारन यांनी या वर्षी नॉर्दर्न सुपरचार्जर्स टीम विकत घेतली. या खरेदीची किंमत तब्बल ११५५ कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते. याआधी या टीममध्ये ५१म शेअर्स यॉर्कशायर क्लबचे आणि ४९म एउइ चे होते. ही दोन्ही हिस्सेदारी एकाच वेळी खरेदी करून आता ही टीम पूर्णपणे मारन कुटुंबाच्या नियंत्रणात आली आहे.

### अर्शदीप सिंगसोबत अन्याय का होतोय? बॉलिंग कोचने सांगितला पुढच्या तीन महिन्याचा प्लॅन!

मुंबई–टीम इंडिया सध्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध पाच सामन्यांची टी–ट्वेंटी मालिका खेळत आहे. अशातच पहिल्या दोन मॅचमध्ये सूर्यकुमार यादव आणि हेड कोच गौतम गंभीर यांनी अर्शदीप सिंगला संघाबाहेर बसवलं होतं. तर गंभीरच्या लाडक्या हर्षित राणाला संधी दिली गेली. अशातच तिसऱ्या सामन्यात गंभीरने चूक सुधारली अन् अर्शदीपला प्लेइंग इलेव्हनमध्ये घेतलं. अशातच आता टीम इंडियाच्या बॉलिंग कोचने मोठा खुलासा केला आहे.व्यापक विचार लक्षात घेऊन कॉम्बिनेशन वापरतोय बॉलिंग कोच मोर्ने मोर्केल यांनी गुरुवारी चौथ्या टी–ट्वेंटी आंतरराष्ट्रीय मॅचपूर्वी पत्रकारांना सांगितलं, ''अर्शदीप अनुभवी बॉलर आहे आणि त्याला माहित आहे की आम्ही व्यापक विचार लक्षात घेऊन वेगवेगळे कॉम्बिनेशन वापरत आहोत. त्याला माहित आहे की तो एक विश्वस्तरीय बॉलर आहे आणि त्याने पॉवरप्लेमध्ये जास्त विकेट घेतले आहेत.'

***

### दक्षिण आफ्रिका सीरिजसाठी टीमची घोषणा, या १५ जणांना संधी!

मुंबई–दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दोन टेस्ट मॅचच्या सीरिजसाठी भारतीय टीमची घोषणा करण्यात आली आहे. ऋषभ पंतचं भारतीय टीममध्ये कमबॅक झालं आहे. इंग्लंड दौऱ्यातल्या चौथ्या टेस्टमध्ये दुखापत झाल्यानंतर पंत पाचवी टेस्ट आणि वेस्ट इंडिजविरुद्धच्या टेस्ट सीरिजमध्ये खेळू शकला नव्हता. याशिवाय देवदत्त पडिक्कलचंही भारतीय टीममध्ये कमबॅक केलं आहे. तर हर्षित राणाला टीम इंडियातून डच्चू देण्यात आला आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातली पहिली टेस्ट १४ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे, तर दुसरी टेस्ट २२ नोव्हेंबरपासून खेळवली जाईल. पहिली टेस्ट कोलकात्यामध्ये आणि दुसरी गुवाहाटीमध्ये होईल. यानंतर दोन्ही टीममध्ये ३ वनडे आणि ५ टी–२० मॅचची सीरिज होईल, पण या दोन्ही सीरिजसाठी टीम इंडियाची घोषणा केली गेलेली नाही. टेस्ट सीरिजसाठी भारतीय टीम–शुबमन गिल, रिषभ पंत, यशस्वी जैस्वाल, केएल राहुल, साई सुदर्शन, देवदत्त पडीकल, ध्रुव जुरेल, रविंद्र जाडेजा, वॉशिंगटन सुंदर, जसप्रीत बुमराह, अक्सर पटेल, नितीश कुमार रेड्डी, मोहम्मद सिराज, कुलदीप यादव, आकाश दीप.

# दक्षिण आफ्रिकेच्या कसोटी मालिकेसाठी उपकर्णधारपदी पंत

## ऋषभ पंतचे पुनरागमन

## शमीला पुन्हा डावलले




दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या आगामी दोन कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेसाठी यष्टिरक्षक–फलंदाज ऋषभ पंतचे भारतीय संघात पुनरागमन झाले आहे.
दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या आगामी दोन कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेसाठी यष्टिरक्षक–फलंदाज ऋषभ पंतचे भारतीय संघात पुनरागमन झाले आहे. अलीकडेच 'अ' संघाकडून खेळताना पंतने तंदुरुस्ती आणि लय सिद्ध केली. त्यामुळे निवड समितीने त्याचा कसोटी संघात समावेश करताना त्याला पुन्हा उपकर्णधारपदाची जबाबदारीही दिली आहे.
जुलैमध्ये इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या कसोटी सामन्यात फलंदाजीदरम्यान पंतच्या पायाला चेंडू लागला होता. त्याचा पाय फ्रॅक्चर झाला आणि त्याला चार महिने स्पर्धात्मक क्रिकेटपासून दूर राहावे लागले. मात्र, आता तो पूर्णपणे तंदुरुस्त झाला असून गेल्याच आठवड्यात दक्षिण आफ्रिका 'अ' संघाविरुद्ध त्याने ९० धावांची शानदार खेळी केली होती.
भारतीय संघाने गेल्या कसोटी मालिकेत वेस्ट इंडिजविरुद्ध २–० असे निर्भेळ यश संपादन केले होते. त्या संघातील यष्टिरक्षक–फलंदाज नारायण जगदीशन आणि वेगवान गोलंदाज प्रसिध कृष्णा यांना वगळण्यात आले आहे. त्यांच्या जागी पंत आणि आकाश दीपचा समावेश करण्यात आला आहे. खांद्याच्या दुखापतीमुळे आकाश दीपला काही काळ मैदानाबाहेर राहावे लागले. परंतु त्याने इराणी चषक आणि रणजी करंडकातून यशस्वी पुनरागमन केले आहे.
पंतच्या पुनरागमनामुळे संघनिवडीचा पेच निर्माण होऊ शकेल. त्याच्या अनुपस्थितीत ध्रुव जुरेलने चमकदार कामगिरी केली होती. विंडीजविरुद्धच्या कसोटीत त्याने शतक साकारले होते. पंत पहिल्या पसंतीचा यष्टिरक्षक असल्याने जुरेलला अंतिम ११ खेळाडूंत स्थान मिळवणे अवघड जाऊ शकेल. मात्र, तिसऱ्या क्रमांकावरील साई सुदर्शनला कामगिरी उंचावण्यात अपयश आल्यास त्याच्या जागी जुरेलला केवळ फलंदाज म्हणून खेळिवण्याबाबत भारतीय संघ विचार करू शकेल.
संघ : शुभमन गिल (कर्णधार), ऋषभ पंत (उपकर्णधार / यष्टिरक्षक), यशस्वी जैस्वाल, केएल राहुल, साई सुदर्शन, देवदत्त पडिक्कल, ध्रुव जुरेल (यष्टिरक्षक), रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल, कुलदीप यादव, नितीश रेड्डी, मोहम्मद सिराज, जसप्रीत बुमरा, आकाश दीप.
अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीला पुन्हा कसोटी संघातील स्थानापासून वंचित राहावे लागले आहे. तंदुरुस्तीबाबत संभ्रम असल्याने शमीला याआधी वेस्ट इंडिजविरुद्धच्या मालिकेतून डावलण्यात आले होते. मात्र, त्यानंतर रणजी करंडकात त्याने बंगालसाठी सलग तीन सामने खेळले. त्यात त्याने एकूण १५ बळीही मिळवले. मात्र, ३५ वर्षीय शमीला पुन्हा कसोटी संघाबाहेर ठेवण्यात आल्याने आता त्याची आंतरराष्ट्रीय कारकीर्दच धोक्यात आल्याची चर्चा सुरू झाली आहे.
'अ' संघांतील सामना आजपासून
बंगळूरु : भारत 'अ' आणि दक्षिण आफ्रिका 'अ' संघांतील दुसरा अनौपचारिक कसोटी सामना आज, गुरुवारपासून खेळवला जाणार आहे. भारताने पहिला सामना जिंकत मालिकेत १–० अशी आघाडी मिळवली आहे. आता दुसऱ्या सामन्यात कर्णधार ऋषभ पंत, केएल राहुल, मोहम्मद सिराज आणि कुलदीप यादव या भारतीय खेळाडूंसह दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बव्हुमाच्या कामगिरीवर सर्वांचे लक्ष असेल. तसेच पहिल्या अनौपचारिक कसोटीत साई सुदर्शन झगडताना दिसला. त्यामुळे त्याचाही कामगिरीत सुधारणा करण्याचा प्रयत्न असेल.



**मालिकेचा कार्यक्रम**
पहिली कसोटी : १४ ते १८ नोव्हेंबर, कोलकाता
दुसरी कसोटी : २२ ते २६ नोव्हेंबर, गुवाहाटी

# कुस्तीपटू सिकंदर शेखविरुध्द उत्तर भारतीय गटाचे महाराष्ट्र केसरी उपविजेता राजेंद्र लोणारीचा मोठा दावा



राजेंद्र लोणार

नाशिक–कुस्तीपटू पहिलवान सिकंदर शेख यास अवैध शस्त्र तस्करी प्रकरणात पंजाब पोलिसांनी अटक केल्यापासून त्याच्या समर्थनार्थ महाराष्ट्रातील अनेक जण पुढे आले आहेत. असे कटकारस्थान करून सिकंदर शेखची प्रतिमा मलिन करुन त्याला कुस्तीच्या विश्वातून उठवण्याचा प्रयत्न हरियाणा आणि पंजाबातील स्पर्धक करत असल्याचा आरोप महाराष्ट्र केसरी उपविजेता येवला येथील राजेंद्र लोणारी, पहिलवान भगवान चित्ते यांनी केला आहे.
कोल्हापूरच्या गंगावेश तालीममध्ये घडलेला आणि महाराष्ट्र केसरी जिंकणारा आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू सिकंदर शेख सध्या वादात सापडला आहे. सिकंदरसह इतरही काही संशयितांना पोलिसांनी अटक केली. हरियाणा आणि राजस्थानमध्ये सक्रिय असलेल्या विक्रम उर्फ पपला गुर्जर टोळीशी या संशयितांचा संबंध असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.
सिकंदर शेख हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा कुस्तीपटू असून तो सैन्यात क्रीडा कोट्यातून भरती झाला होता. नंतर त्याने नोकरी सोडली. कला शाखेचा पदवीधर असलेला सिकंदर विवाहित आहे. पाच महिन्यांपासून पंजाबमधील मुल्लांपूर गरीबदास येथे भाड्याच्या घरात राहत होता. शस्त्र तस्करी साखळीत त्याने मध्यस्थाची भूमिका निभावल्याचा पोलिसांचा संशय आहे.
कोल्हापूरच्या नामांकित गंगावेश तालीममध्ये प्रशिक्षण घेतलेल्या आणि दोन वर्षापूर्वी महाराष्ट्र केसरी किताब पटकावलेला सिकंदर शेख असे काही कृत्य करेल, यावर त्याच्या सहकाऱ्यांचा विश्वास बसत नाही.
एका गरीब कुटुंबातून येऊन सिकंदरने आपल्या कष्टाने तालमीत तासंतास घाम गाळून शरीर कमावले, कुस्तीचे मैदान गाजवले, कुस्तीच्या क्षेत्रात आपले वर्चस्व निर्माण केले. कुस्तीच्या जोरावर तो वर्षाकाठी कोट्यवधी रुपयांची बक्षीसे मिळवतो, आलिशान मोटारी, दुचाकी अनेक गाड्या त्याने जिंकल्या आहेत.



सिकेंदर शेख

महाराष्ट्रातच नव्हे तर पंजाब–हरियाणासह देशभरात ख्याती मिळवलेला हा पहिलवान या अशा छोट्याशा चोरीच्या धंद्यात स्वत:ला गुंतवणाराच नाही. त्याला जर असे करायचे असते तर त्याने कुस्तीसाठी एवढी मेहनत कशाला केली असती, असा प्रश्न महाराष्ट्र केसरी उपविजेता राजेंद्र लोणारी आणि पहिलवान भगवान चित्ते यांनी केला आहे. सिकंदरला अशा काळ्या धंद्याची गरज नाही. हिंद केसरीची स्पर्धा सहा महिन्यात होण्याची शक्यता आहे. या स्पर्धेतून सिकंदरला बाद करण्यासाठी हा सुनियोजित कट असल्याचा आरोप लोणारी, चित्ते यांनी केला आहे.
सिकंदर कोल्हापुरातील ज्या गंगावेश तालमीत सराव करतो, त्या तालमीशी आमचा अनेक वर्षापासून संबंध आहे. सिकंदरने प्रामाणिकपणे सराव करून हे यश संपादित केले आहे. तो कुस्तीव्यतिरिक्त अशा कोणत्याही घाणेरड्या धंद्याकडे जाऊ शकत नाही. अशा गुणी पहिलवानाला महाराष्ट्राच्या पुत्राला उत्तर भारतातील कुस्तीमधील गटाने स्पर्धेतून बाद करण्यासाठी कटकारस्थान केले आहे. या कृत्याचा आम्ही जाहीर निषेध करीत आहोत. महाराष्ट्रातील सर्व राजकीय नेत्यांनी व मुख्यमंर्त्यांनी या प्रकरणात सिकंदरला न्याय मिळवून देण्यासाठी सर्वतोपरीने प्रयत्न करावे, अशी मागणीही लोणारी, चित्ते यांनी केली आहे.


# २० वर्षाहून अधिक काळ खेळणारा माजी कर्णधार ड्रग्जच्या आहारी; बोर्डाने करार केला रद्द

मुंबई–झिम्बाब्वेचा अनुभवी खेळाडू शॉन विलिम्यस ड्रग्जच्या आहारी गेल्याचं स्पष्ट झालं आहे. ड्रग्जच्या विळख्यातून बाहेर पडण्यासाठी विलियम्स रिहॅब प्रक्रियेत असून, त्यामुळे आगामी मालिकांसाठी त्याच्या नावाचा विचार करण्यात येणार नाही. विलियम्सबरोबरच्या वार्षिक कराराचं नूतनीकरण करण्यात येणार नाही.विलियम्सच्या नावावर याआधीही शिस्तभंगाच्या घटना आहेत. सातत्याने त्याने अनुपलब्धता दर्शवली आहे. त्याच्यामुळे संघाच्या तयारी आणि कामगिरीवर परिणाम झाला आहे असं झिम्बाब्वे क्रिकेटने जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.
३९वर्षीय विलियम्सने २० वर्षाच्या प्रदीर्घ कारकिर्दीत झिम्बाब्वेसाठी २७३ आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. अनुभवी खेळाडू असला तरी त्याच्या कराराचं नूतनीकरण करण्यात येणार नाही असं झिम्बाब्वे क्रिकेटने स्पष्ट केलं आहे. काही दिवसांपूर्वीच झालेल्या वर्ल्ड कप आफ्रिका क्वालिफायर्स स्पर्धेतून वैयक्तिक कारणास्तव अगदी आयत्या वेळेला माघार घेतली होती. या प्रकारानंतर झिम्बाब्वे क्रिकेट बोर्डाने अंतर्गत चौकशी केली. त्यावेळी विल्यम्सने ड्रग्जच्या आहारी गेल्याचं कबुल केलं. यातून बाहेर पडण्यासाठी स्वत:हूनच रिहॅब प्रक्रियेत सहभागी झाल्याचं सांगितलं.बोर्डाशी करारबद्ध खेळाडूंनी खेळभावना जपणं आणि आचारसंहितेचं काटेकोर पालन करणं अपेक्षित आहे. विल्यम्सने तातडीने रिहॅब प्रक्रिया पूर्ण करावी. २००५ मध्ये झिम्बाब्वेसाठी पदार्पण केल्यापासून ८००० धावा केल्या आहेत. वनडे क्रिकेटमध्ये विल्यम्सने ३७.५३च्या सरासरीने ५२१७ धावा केल्या असून यामध्ये ८ शतकं आणि ३७ अर्धशतकांचा समावेश आहे. सर्वाधिक काळ आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळत असलेला खेळाडू होण्याचा मान यंदाच्या वर्षीच विल्यम्सला मिळाला होता.


### ती टीममधल्या ज्युनियर खेळाडूंना मारते, २०२५ च्या वर्ल्ड कपनंतर कॅप्टनवर सनसनाटी आरोप!

दिल्ली–भारत आणि साउथ आफ्रिका यांच्यात वर्ल्ड कपचा अंतिम सामना खेळला गेला. या रोमांचक सामन्यात अखेर कित्तेक वर्षाची प्रतीक्षा संपवली आणि भारतीय महिला संघाने उत्तम कामगिरी करत वर्ल्ड कपवर भारताचं नाव कोरल. अशातच आता एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. वर्ल्ड कप नंतर एका खेळाडूने कॅप्टनवर गंभीर आरोप केले आहेत.
बांगलादेश महिला क्रिकेट संघातून सध्या बाहेर असलेली स्टार खेळाडू जहांआरा आलमने अलिकडच्या एकदिवसीय विश्वचषकानंतर राष्ट्रीय बोर्ड आणि कर्णधार निगार सुलतानावर गंभीर आरोप केले आहेत. बांगलादेशी वृत्तपत्र कालेर कंठाशी बोलताना, ३२ वर्षीय आलम म्हणाली की सध्याची कर्णधार सुलताना वारंवार संघाच्या ज्युनियर क्रिकेटपटूंना मारहाण करते.बांगलादेशसाठी ५२ एकदिवसीय आणि ८३ टी–२० आंतरराष्ट्रीय सामने खेळणारी आलम शेवटचा सामना डिसेंबर २०२४ मध्ये आयर्लंडविरुद्ध खेळला होता आणि त्यानंतर तिला संघातून वगळण्यात आले.

# हरमनप्रीत कौरचा वर्ल्डकप स्पेशल टॅटू, काय आहे टॅटूमधील त्या दोन आकड्यांचा अर्थ?



नवी दिल्ली –भारतीय महिला क्रिकेट संघाने पहिलाच एकदिवसीय विश्वचषक आपल्या नावे केला आहे. भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेचा पराभव करत ५२ धावांनी सामना जिंकला आणि इतिहास घडवला. तब्बल २५ वर्षांनंतर महिला एकदिवसीय विश्वचषकाच्या इतिहासात इंग्लंड, ऑस्ट्रेलिया व इंग्लंड हे संघ सोडून इतर संघाने जेतेपद आपल्या नावे केले. भारतीय संघाने कर्णधार हरमनप्रीत कौरच्या नेतृत्त्वाखाली वर्ल्ड चॅम्पियन होण्याचा मान मिळवला. वर्ल्ड चॅम्पियन ठरल्यानंतर हरमनने खास टॅटू काढला आहे.
हरमनप्रीत कौरने संपूर्ण स्पर्धेत संघाचं उत्कृष्ट नेतृत्त्व केलं. अंतिम सामन्यातही हरमनने गोलंदाजांना उत्कृष्ट रितीने वापरत संघाला विजयाकडे नेलं. सर्वात लक्षवेधी गोष्ट म्हणजे संघाला विकेटची गरज असताना हरमनने गोलंदाजांचे पर्याय तपासून पाहिले, पण विकेट मिळत नव्हती. यादरम्यान हरमनने एक मोठा डाव खेळला आणि तिने पार्ट टाईम गोलंदाज शफाली वर्माला गोलंदाजी दिली.
हरमनप्रीतचा हा निर्णय सामन्याचा टर्निंग पॉईंट ठरला. हरमनने शफाली वर्माला गोलंदाजी दिली आणि तिने दोन षटकांत दोन मोठे विकेट घेतले. सुरूवातीला तिने सुने लुसला झेलबाद केलं तर दुसऱ्या षटकात मारिझन कापला झेलबाद करवत दुसरी सर्वात मोठी विकेट मिळवून दिली. यानंतर हरमनने दीप्ती शर्माच्या चेंडूवर एक कमालीचा झेल टिपला आणि तिथेच दक्षिण आफ्रिकेचा संघ सर्वबाद झाला आणि भारत विश्वविजेता ठरला.
हरमनप्रीत कौरने या सामन्यानंतर एक खास टॅटू काढला आहे. हरमनने डाव्या हातावर वर्ल्डकप ट्रॉफी असलेला टॅटू काढला आहे आणि २०२५ आकडा लिहिला आहे. या पोस्टच्या कॅप्शनमध्ये तिने लिहिलं आहे, मफ्फ़माझ्या हृदयावर आणि हातावर कायमचं कोरला गेला क्षण. पहिल्या दिवसापासून तुझी वाट पाहत होते आणि आता दररोज तुला पाहून कृतज्ञ राहीन,फ्फ़ असं तिनं तिच्या नव्या टॅटूच्या फोटोला कॅप्शन दिलं.
काय आहे हरमनप्रीत कौरच्या टॅटूवरील ५२ आकड्यामागचं रहस्य?
हरमनप्रीत कौरच्या या टॅटूमध्ये २०२५ शिवाय ५२ आकडाही तिच्या टॅटूमध्ये लिहिला आहे. दुसरा आकडा महिला विश्वचषक अंतिम सामन्यात भारताने ५२ धावांनी विजय मिळवला आहे यासंबंधित असू शकतो. याशिवाय हा महिला विश्वचषकाचा ५२ वा सीझन होता, जो भारताने जिंकला. महिला विश्वचषकाला १९७३ मध्ये सुरूवात झाली होती.
लहानपणी वर्ल्डकप जिंकण्याचे पाहिलेले स्वप्न पूर्ण केल्यानंतर, भारतीय कर्णधाराने पुढच्या पिढीसाठी एक प्रेरणा देणारा मेसेजही दिला. हरमन म्हणाली, मफ्फ़स्वप्न पाहणे कधीच थांबवू नका. तुमचे नशीब तुम्हाला कुठे घेऊन जाईल, हे कुणालाच माहीत नसते.



# आ. कराड यांच्या प्रयत्नातून १४ विकास कामासाठी तांडा वस्ती सुधार योजने अंतर्गत एक कोटीचा निधी

**लातूर/प्रतिनिधी** : वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत भाजपाचे नेते आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील १४ गावातील विविध विकास कामासाठी १ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. सदरील निधी मंजूर झाल्याने त्या त्या वस्तीतील नागरिकांच्या वतीने आ. कराड यांचे आभार व्यक्त केले आहेत.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध वाडी वस्तीत राज्याच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी मिळावा यासाठी राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री ना. अतुलजी सावे यांच्याकडे भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला. आ. रमेशआप्पा कराड यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे लातूर ग्रामीण मतदार संघातील १४ विविध वाडी वस्तीतील विकास कामासाठी तब्बल १ कोटी रुपयांचा निधी राज्याच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजुरी दिली आहे.

वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत लातूर तालुक्यातील ८ रेणापूर तालुक्यातील ८ आणि भादा सर्कल मधील २ गावे असे एकूण लातूर ग्रामीण मतदार संघातील १४ गावाचा समावेश आहे. त्यात लातूर तालुका - भाडगाव खंडोबा मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉक ७ लक्ष, भातांगळी खंडोबा मंदिर समोर पेव्हर ब्लॉक ७ लक्ष, बोरगाव बु. ज्योतिबा नगर रस्ता करणे ७ लक्ष, मुशिराबाद होळकर नगर पेव्हर ब्लॉक रस्ता करणे ७ लक्ष, वांजरखेडा चव्हाणवाडी रस्ता करणे ७ लक्ष, कानडी बोरगाव अहिल्यादेवी होळकर नगर रस्ता करणे ७ लक्ष, रेणापूर तालुक्यातील - दर्जी बोरगाव भनाई मंदिरासमोर सभामंडप बांधकाम करणे ८ लक्ष, गरसुळी



गरसुळीतांडा येथे रस्ता करणे ७ लक्ष, भोकरंबा खंडोबा वस्ती सिमेंट रस्ता करणे ७ लक्ष, तळणी धनगर वस्ती रस्ता करणे ७ लक्ष, फावडेवाडी सिमेंट रस्ता करणे ७ लक्ष, आणि भादा सर्कल मधील सत्तरधरवाडी सेवादास नगर येथे सिमेंट रस्ता करणे ७ लक्ष, भेटा धनगर वस्ती बिरदेव मंदिरासमोर सभामंडप बांधकाम करणे ८ लक्ष याप्रमाणे एकूण १ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेतून १४ वाडी वस्ती व गावातील विविध विकास कामासाठी निधी मिळवून दिल्याबद्दल त्यांचे त्या त्या भागातील भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आभार व्यक्त केले आहेत.

## मुक्तांगण इंग्लिश स्कूल मध्ये गुरु नानक जयंती साजरी



**लातूर/प्रतिनिधी** :लातूर येथील श्री साई मंदिरासमोरील, विशाल नगर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित मुक्तांगण इंग्लिश स्कूल मध्ये गुरु नानक जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या सुमेरा शेख, यांच्या हस्ते गुरु नानक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शाळेच्या शिक्षिका माधुरी वाघमारे यांनी गुरु नानक यांच्या जीवनाविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

शिखांचे प्रथम गुरू व शिख धर्माचे संस्थापक गुरूनानक एक महापुरूष होते. आईच्या धार्मिक विचारांचा प्रभाव गुरूनानक यांच्यावर देखील पडला. लहानपणापासुनच ते कुशाग्र बुध्दीचे होते चिंतनशील आणि एकांतप्रीय हे त्यांच्या स्वभावाचे विशेष होते. गुरूनानकसाहेबांचे मन शालेय शिक्षणापेक्षा साधुसंतांच्या आणि विव्दानांच्या सान्निध्यात जास्त रमत असे.याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी गुरु नानक यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. शाळेच्या शिक्षिकांनी गुरु नानक जयंतीच्या विदयार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्र संचालन शाळेच्या शिक्षिका प्रणिता सुरवसे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले.

## लॉर्ड श्रीकृष्ण स्कूल मध्ये गुरु नानक जयंती उत्साहात साजरी



**लातूर/प्रतिनिधी** :लातूर येथील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल मध्ये गुरु नानक जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी, समन्वयक रौफ शेख, समन्वयिका रुपाली कोकाटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, विद्या पाटील यांच्या हस्ते गुरु नानक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी शाळेच्या समन्वयिका रुपाली कोकाटे यांनी गुरु नानक यांच्या जीवनाविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. गुरु नानक हे शीख धर्माचे पहिले गुरु होते. शीख धर्मासाठी गुरु नानक जयंती हा मोठा सण आहे. कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी गुरु नानक जयंती साजरी केली जाते. गुरु नानक जयंतीला प्रकाश पर्व असेही म्हणतात. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी गुरु नानक यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. शाळेच्या शिक्षकांनी गुरु नानक जयंतीच्या विदयार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या शिक्षिका, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले.

## अहमदपूर येथे सद्भावना संदेश यात्रेचे स्वागत, नांदेड येथून बिदर असेल प्रवास

**अहमदपूर/प्रतिनिधी** : नांदेड येथील शिख बांधवांच्या वतीने दरवर्षी गुरुनानक देवजी यांच्या जयंतीनिमित्त जगा आणि जगु दया हा संदेश घेऊन नांदेड ते बिंदरपर्यंत काढण्यात येणाऱ्या सद्भावना संदेश यात्रेचे अहमदपूर शहरात भव्य स्वागत करण्यात आले.

ही सद्भावना यात्रा नांदेड गुरुद्वाराचे महाराज श्री शेरसिंग फौजी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या अनेक वर्षांपासून काढली जात असून, याही वर्षी त्यांच्या मार्गदर्शनाखाली ही यात्रा निघाली. यात्रेचे अहमदपूर शहरातील स्वातंत्र्यवीर सावरकर चौक येथील रॉयल मराठा हॉटेल समोर रॉयल मराठा ग्रुपच्या वतीने उत्साहात स्वागत करण्यात आले.

यात्रेत अमरसिंग फौजी, सुरजीतसिंग फौजी, सुखकबीरसिंग फौजी, कलुसिंग फौजी तसेच अनेक शिख बांधव सहभागी झाले होते. या प्रसंगी रॉयल मराठा ग्रुपतर्फे फुलांचा वर्षाव करून, पुष्पहार अर्पण करून व गोडधोड वाटप करून यात्रेतील भाविकांचे स्वागत करण्यात आले.स्वागत समारंभात पांडुरंग केंद्रे, निरमलाबाई केंद्रे, पांडुरंग लोकरे, बाळासाहेब आगलावे, संतोष भाले आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमास अनेक नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सद्भावना संदेश यात्रा ही समाजातील एकोपा, शांतता आणि मानवतेचा संदेश देणारी प्रेरणादायी परंपरा म्हणून सर्वत्र आदराने पाहिली जाते. यात्रेच्या स्वागत प्रसंगी जगा आणि जगु दया या संदेशाचा जयघोष घुमला आणि सद्भावनेच्या भावनेने भारावून गेले.



# १० शालेय विद्यार्थ्यांना सायकलीचे वाटप

## यशवंतवाडी ग्रामपंचायतचा अभिनव उपक्रम

**लातूर/प्रतिनिधी** : गावातील शालेय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी बाहेरगावी जावे लागते प्रवासाची कसलीही सुविधा नसल्याची अडचण लक्षात घेऊन रेणापूर तालुक्यातील मौजे यशवंतवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने दहा शालेय विद्यार्थ्यांना भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते सायकलीचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन सायकल वाटपाचा अभिनव उपक्रम हाती घेतल्याबद्दल यशवंतवाडी ग्रामपंचायतचे अनेकांनी कौतुक केले आहे.

रेणापूर तालुक्यातील मौजे यशवंतवाडी येथे शिक्षणाची सोय नसल्याने गावातील मुला मुलींना कारेपूर येथे शाळेकरीता जावे लागत असे मात्र शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रवासाची कुठलीच नियमित सोय नसल्याने पायी चालत जाऊन शिक्षण घ्यावे लागत होते. शालेय विद्यार्थ्यांची ही मोठी गैरसोय लक्षात घेऊन यशवंतवाडी ग्रामपंचायतीने पंधराव्या वित्त आयोगा अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठी सायकली खरेदी करण्याचा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.

पंधराव्या वित्त आयोगा अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या १० सायकलीचे वाटप लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते बुधवारी सकाळी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात करण्यात आले. यावेळी अनुष्का चव्हाण, राधा सूर्यवंशी, जागृती सूर्यवंशी, भक्ती चव्हाण, मोहिनी सूर्यवंशी, सार्थक मोरे, माऊली जाधव, गजानन चव्हाण, जानवी चव्हाण, नक्ष चव्हाण या शालेय



विद्यार्थी आणि विद्यार्थिनीच्या चेहऱ्यावर मोठा आनंद दिसून येत होता.

सायकल वाटप प्रसंगी यशवंतवाडीचे सरपंच ओम चव्हाण यांच्यासह भाजपाचे महेंद्र गोडभरले, अभिषेक आकनगिरे, दशरथ सरवदे, वसंत करमुडे, विजय काळे, अमर चव्हाण, भाऊसाहेब गुळबिले, लक्ष्मण यादव, संतोष चव्हाण, श्रीकृष्ण जाधव, बाजीराव साखरे, गणपत चव्हाण, विठ्ठल चव्हाण, विष्णू चव्हाण, रामकिशन सूर्यवंशी, किशोर चव्हाण, महेश सूर्यवंशी, सुनील चव्हाण, मुकुंद चव्हाण, बालासाहेब सूर्यवंशी यांच्यासह ग्रामस्थ विद्यार्थ्यांचे पालक व इतर अनेक जण होते. यावेळी आ. रमेशअप्पा कराड यांनी शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधून शैक्षणिक प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या. यशवंतवाडी ग्रामपंचायतीने सायकली वाटपाचा अभिनव उपक्रम हाती घेतल्याबद्दल शालेय विद्यार्थ्यांच्या पालकांनी समाधान व्यक्त केले तर अनेकांनी कौतुक केले.

## हरियाणामध्ये २५ लाख मतांची चोरी, राहुल गांधींचा निवडणूक आयोगावर गंभीर आरोप

नवी दिल्ली: बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीसाठी उद्यापासून (६ नोव्हेंबर) मतदान होणार आहे. या मतदानापूर्वी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज नवी दिल्लीतील अखिल भारतीय काँग्रेस समिती (एआयसीसी) मुख्यालयात पत्रकार परिषद घेतली. यावेळी मत चोरीच्या मुद्द्यावरून त्यांनी हायड्रोजन बॉम्ब सोडला. हरियाणा विधानसभा निवडणुकीत घोळ झाल्याचा आरोप करत हरियाणामध्ये २५ लाख मतांची चोरीला झाल्याचा दावा राहुल गांधी यांनी केली आहे.

२२ वेळा बनावट ओळखपत्र वापरून मतदान : अनेक राज्यांमधून मत चोरीच्या तक्रारी आल्याचं राहुल गांधी यांनी सांगितलं. ते म्हणाले,'' हरियाणामध्ये मत चोरी झाल्याचं आढळून आलं. हरियाणामध्ये, एक्झिट पोलमध्ये काँग्रेस पुढं होती. नंतर भाजपाचा विजय झाला. २५ लाख मतं चोरीला गेली. कर्नाटकातील महादेवपुरा इथंही अशीच एक घटना घडली. तसचं हरियाणातील १० मतदान केंद्रांवर एका मुलीनं २२ वेळा बनावट ओळखपत्र वापरून मतदान केलं. अनेक मतदार यादीत एका ब्राझिलियन मॉडेलचा फोटो वापरण्यात आला,'' असं राहुल गांधी यांनी सांगत निवडणूक आयोगावर आरोप केले आहेत.

# मनपावर भाजपाचा झेंडा फडकावण्यासाठी सज्ज व्हा - अजित पाटील कव्हेकर

## माजी नगरसेवक गिरीश पाटलांच्या सत्कार प्रसंगी पदाधिकाऱ्यांना आवहान

**लातूर/प्रतिनिधी** : केंद्र व राज्यसरकारच्या माध्यमातून विकासाची गंगा सातत्याने वाहत असून लातुरातही विकास गंगा पोहचलेली आहे. विकासाचा नवा लातूर पॅटर्न घडवण्यासाठी महापालिकेतील भाजपाची सत्ता आवश्यक असून जनता विकासासाठी भाजपला मतदान देण्यास तयार आहे. मात्र पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यासह इच्छुकांनी जनतेपर्यंत पोहचणे आवश्यक असल्याचे सांगून मनपावर भाजपचा झेंडा फडकावण्यासाठी प्रत्येकानी सज्ज व्हावे असे आवहान करून भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी माजी नगरसेवक गिरीश पाटील यांच्या प्रवेशाने मनपा निवडणुकीचा श्रीगणेशा झाला असल्याचे सांगितले.

माजी नगरसेवक गिरीश पाटील यांचा मुंबई येथे प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश झाला. या निमिताने शहर जिल्हा भाजपाच्या वतीने माजी नगरसेवक गिरीश पाटील यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी शहर जिल्हा अध्यक्ष अजित पाटील कव्हेकर बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर माजी आ.






शिवाजीराव पाटील कव्हेकर, माजी शहर जिल्हाध्यक्ष शैलेश लाहोटी, गुरुनाथ मगे, प्रदेश उद्योग आघाडीचे सरचिटणीस सुधीर धुत्तेकर, शहर जिल्हा सरचिटणीस संजय गीर, निखील गायकवाड, माजी नगरसेविका शोभा पाटील, स्वाती घोरपडे, श्र्वेता लोंढे, अमृत पाटील आदींची उपस्थिती होती.

समाजातील प्रत्येक घटकांचा विकास होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील केंद्र व राज्य सरकार विविध योजना आणि उपक्रम राबवत असल्याचे सांगून विकास सर्वापर्यंत पोहचला पाहिजे यासाठी कटिबद्द आहे. मात्र याकरिता पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जागरूक राहणे आवश्यक असल्याचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले. विरोधकांकडून सातत्याने जनतेची दिशाभूल करून त्यांच्यामध्ये संभ्रम निर्माण करण्याचे काम होत आहे. मागील काळातही सत्तेत असणाऱ्यांनी अशाच प्रकारे संभ्रम निर्माण केला होता. हि वैचारिक लढाई असून या लढाईसाठी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आता मैदानात उतरणे आवश्यक असल्याचे अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले.

आगामी काळ हा मनपा निवडणुकीचा असून हि निवडणूक आपल्या प्रत्येकासाठी युद्धच असल्याचे सांगून शहर जिल्हा अध्यक्ष अजित पाटील कव्हेकर म्हणाले कि हे युद्ध जिंकण्यासाठी पक्षाच्या प्रत्येक शिलेदारांनी जनतेपर्यंत पोहचवून पक्षाची भूमिका व विकासाचे व्हिजन पटवून देणे आवश्यक आहे. हि लढाई जिंकण्यासाठी संघटन सुद्धा वाढवणे गरजेचे असून त्याचाच एक भाग म्हणजे माजी नगरसेवक गिरीश पाटील यांचा प्रवेश आहे. गिरीश पाटील यांच्या प्रवेशाने मनपा निवडणुकीचा श्रीगणेशा केला असून विकासाचा नवा लातूर पॅटर्न घडवण्यासाठी व निवडणूक जिंकण्याकरिता पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यासह इच्छुकांनी सज्ज व्हावे असे आवहान शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले.

माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले कि भारत हा विश्र्वगुरु होण्याच्या दृष्टीने अतिशय वेगाने वाटचाल करत असून या वाटचालीला अधिक गती देण्यासाठी प्रत्येकानी पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे आवश्यक आहे. या दृष्टीने आगामी महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपला विजयी करण्यासाठी प्रत्येकानी आपला वाटा उचलावा आणि लातूर शहर स्मार्ट सिटी करण्यासाठी आपले योगदान द्यावे असे आवहान केले.

माजी नगरसेवक गिरीश पाटील यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले कि मी भारतीय जनता पक्षात नव्हे तर परिवारात आलेला असून या परिवाराच्या माध्यमातून शहराच्या विकासाला चालना देण्यासाठी पक्ष जी जबाबदारी देईल ती यशस्वीपणे पार पडेल आणि पक्षाची विचारधारा शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी सर्वस्वी योगदान देईन असा विश्र्वास दिला.

या प्रसंगी माजी शहर जिल्हाध्यक्ष शैलेश लाहोटी, गुरुनाथ मगे, प्रदेश उद्योग आघाडीचे सरचिटणीस सुधीर धुत्तेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शहर जिल्हा उपाध्यक्ष व्यंकटेश कुलकर्णी तर आभार प्रदर्शन माजी नगरसेविका स्वाती घोरपडे यांनी केले. या कार्यक्रमाला पक्ष पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह लातूरकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उस्तुरी ते टाकळी जाणाऱ्या रस्त्यावरती पुलाला मोठे भगदाड प्रवाशांची गैरसोय

**निलंगा/प्रतिनिधी** : तालुक्यातील उस्तुरी ते टाकळी दरम्यान असलेल्या नाल्यावर मुख्य रस्त्याच्या पुलाला भले मोठे भगदाड पडले असून याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष असल्याचे दिसत आहे.

यंदा झालेल्या अतिवृष्टीमुळे नदी नाल्यांना पूर आल्याने रस्त्यावरील पुलांचेही मोठे नुकसान झाले असून ऊसतूरी. ते टाकळी रस्त्यावरील पुलाला मोठे भगदाड पडले आहे. पुलावरील रस्ता अरुंद झाला असून या रस्त्यावरून प्रचंड कसरत करीत वाहनधारक प्रवास करत आहेत. कमकुवत झालेल्या या पुलाला भविष्यात धोका झाल्यास जीवित हानी झाल्याशिवाय राहणार नाही तसेच ऐन वळणावर या पुलाला भगदाड पडल्यामुळे दुचाकी स्वारांना हा खड्डा लवकर दिसत नाही त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



खरंतर या मुख्य रस्त्याची देखभाल दुरुस्ती संबंधित विभागाने तात्काळ करायला पाहिजे होती पण संबंधित विभागाला याकडे लक्ष देण्याची गरज वाटत नाही आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवाशी यांचं काही देणंघेणं नाही. तात्काळ या पुलाची दुरुस्ती करून या मार्गाची वाहतूक सुरळीत करावी अशी मागणी येथील जनतेतून व वाहनधारकातून होत आहे.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# महाव्यवस्थापकांकडून मध्य रेल्वेच्या ११ कर्मचाऱ्यांना संरक्षा पुरस्कार प्रदान




**मुंबई/प्रतिनिधी :** श्री. विजय कुमार , महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांनी ११ मध्य रेल्वे कर्मचाऱ्यांना – मुंबई विभागातील ५ , पुणे विभागातील २, नागपूर विभागातील २, सोलापूर विभागातील १ आणि भुसावळ विभागातील १ यांना महाव्यवस्थापक संरक्षा पुरस्कार प्रदान केला. हा समारंभ ०४.११.२०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता. संरक्षा पुरस्कार हे संबंधित कर्मचाऱ्यांच्या कर्तव्यावरील सतर्कतेची दखल घेऊन, त्यांनी अपघात टाळण्यासाठी केलेल्या योगदानाबद्दल आणि मागील काही महिन्यांतील रेल्वे संचालनाची सुरक्षितता सुनिश्चित केल्याबद्दल प्रदान करण्यात आले. प्रत्येक पुरस्कारामध्ये एक पदक, प्रशस्तीपत्र, उत्कृष्ट संरक्षा कार्याबद्दलचे प्रमाणपत्र आणि रु ३५००/- रोख पारितोषिकाचा समावेश आहे.

पुरस्कार विजेत्यांचा तपशील

मुंबई विभाग

१. श्री विजय कुमार लाडे, मोटरमन, कल्याण, मुंबई विभाग, यांनी २२.०९.२०२५ रोजी गाडी क्रमांक ६१०१५ दिवा–रोहा मेमू वर काम करत असताना कि.मी. ६५/२६ येथे काहीतरी आदळल्यासारखा अनोळखी आवाज ऐकला. त्यांनी तत्काळ गाडी थांबवून तपासणी केली असता रेल्वे रुळ तुटलेला आढळला. त्यांनी त्वरित संबंधित अधिकाऱ्यांना कळवून सर्व आवश्यक सुरक्षा प्रक्रिया अवलंबिल्या. त्यांच्या सतर्कतेमुळे आणि सूक्ष्म निरीक्षणामुळे संभाव्य अपघात टळला.

२. श्री बी. एम. केनेडी, मोटरमन, कल्याण, मुंबई विभाग, ०९.१०.२०२५ रोजी खोपोली लोकल क्रमांक केपी–७ वर काम करत असताना, त्यांना लक्षात आले की, विद्याविहार येथील ५व्या मार्गावर प्रवेश करण्यासाठी सिग्नल एस/६ चुकून बंद झाला आहे. त्यांनी सिग्नल ओलांडला नाही, सर्व संबंधितांना माहिती दिली आणि योग्य सिग्नल मिळाल्यानंतरच पुढे गेला. त्यांच्या सतर्कतेमुळे आणि बारकाईने निरीक्षणामुळे ट्रेन चुकीच्या ट्रॅकवर जाण्यापासून वाचली.

३. श्री कृष्ण मुरारी गुप्ता, लोको पायलट, कल्याण, मुंबई विभाग, यांनी ०६.१०.२०२५ रोजी कल्याण यार्डमध्ये मालगाडी चालविण्यासाठी प्रारंभ परवानगी (डीरींळपस शिीाळीेप) मिळाल्यानंतर गाडी पुढे नेली. त्यांच्या लक्षात आले की पुढील ट्रेलिंग पॉइंटसाठीची मार्ग योग्य प्रकारे सेट झालेला नाही. त्यांनी तत्काळ आपत्कालीन ब्रेक लावून गाडी थांबवली आणि संबंधित अधिकाऱ्यांना कळविले. त्यांच्या सतर्कतेमुळे आणि नेमक्या निरीक्षणामुळे संभाव्य अपघात टळला.

४. श्री सुविचार अनंत तरे, ट्रेन मॅनेजर, कल्याण, मुंबई विभाग, १४.१०.२०२५ रोजी गाडी क्रमांक ६१०२४ पेण – दिवा मेमू गाडीवर कार्यरत होते. पनवेल स्थानकातून गाडी सुटताच त्यांनी अनोळखी आवाज ऐकला आणि अचानक धक्का जाणवला. त्यांनी तत्काळ आपत्कालीन ब्रेक लावून गाडी थांबवली. तपासणीदरम्यान रेल्वे रुळ तुटलेला असल्याचे आढळले. त्यांनी त्वरित संबंधित अधिकाऱ्यांना कळवून सर्व आवश्यक संरक्षा प्रक्रिया अवलंबिल्या. त्यांच्या सतर्कतेमुळे आणि नेमक्या निरीक्षणामुळे संभाव्य अपघात टळला.

५. श्री जगदीश विठोबा भागडे, फिटर, इगतपुरी, मुंबई विभाग, २६.०८.२०२५ रोजी कर्तव्यावर असताना, एका मालगाडीच्या ब्रेक पॉवरची तपासणी करत असताना, त्यांना एका वॅगनच्या एक्सलचा बेअरिंग कप तुटलेला दिसला. त्यांनी ताबडतोब संबंधित सर्वांना माहिती दिली आणि त्यांच्या सतर्कतेमुळे आणि बारकाईने निरीक्षणामुळे संभाव्य दुर्घटना टाळता आली.

पुणे विभाग

६. श्री चंद्र कुमार सिंह, सहाय्यक लोको पायलट, दौंड, पुणे विभाग, ०२.१०.२०२५ रोजी गाडी क्रमांक २२७३२ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस – हैदराबाद एक्सप्रेसवर कर्तव्य बजावत असताना, नियमित तपासणीदरम्यान लोको क्रमांक ३०३१५ मध्ये एक स्प्रिंग तुटलेली असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना कळविले. त्यांच्या सतर्कतेमुळे आणि नेमक्या निरीक्षणामुळे संभाव्य अपघात टळला.

७. श्री अमन राज, पॉईंट्समन, खडकी, पुणे विभाग – दि. २७.९.२०२५ रोजी कर्तव्यावर असताना नियमित तपासणीदरम्यान, मार्गावर क्लिअरन्ससाठी थांबलेल्या एका मालगाडीच्या दोन वॅगनमध्ये ब्रेक ब्लॉक अतिशय तापलेले असल्याचे त्यांनी लक्षात घेतले. तपासणीअंती ब्रेक ब्लॉक बाइंडिंग असल्याचे आढळले. त्यांनी तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना कळविले. त्यांच्या सतर्कतेमुळे आणि नेमक्या निरीक्षणामुळे संभाव्य अपघात टळला.

नागपूर विभाग

८. श्री रोशन लहु राऊत, वरिष्ठ विभाग अभियंता (सी अँड डब्ल्यू), नागपूर, नागपूर विभाग दि. ०१.१०.२०२५ रोजी कर्तव्यावर असताना, गाडी क्रमांक १२८३४ हावडा – अहमदाबाद एक्सप्रेसची रोलिंग–इन तपासणी करत असताना, कोच क्रमांक ड–१ च्या क्सल बॉक्समधून धूर येत असल्याचे त्यांनी लक्षात घेतले. तपासणीदरम्यान क्सल गरम झाल्याचे आढळले. त्यांनी तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना कळविले. त्यांच्या सतर्कतेमुळे आणि नेमक्या निरीक्षणामुळे संभाव्य अपघात टळला.

९. श्री अजय कुमार द्विवेदी, इलेक्ट्रिक सिग्नल मेंटेनर, पुलगाव, नागपूर विभाग, १०.१०.२०२५ रोजी कर्तव्यावर असताना, स्टेशन मॅनेजर कवठा यांच्याकडून ०४.०० वाजता ट्रॅक डाउनची माहिती मिळाल्यावर ट्रॅक तपासणी कर्तव्यासाठी निघाले. तपासणीत रेल्वेला तडा गेल्याचे आढळले. त्यांनी ताबडतोब संबंधित सर्वांना माहिती दिली आणि त्यांच्या सतर्कतेमुळे आणि बारकाईने निरीक्षणामुळे संभाव्य दुर्घटना टाळता आली.

सोलापूर विभाग

१०. श्री समीर जमीर शेख, ट्रॅक मेंटेनर, कुर्डुवाडी, सोलापूर विभाग दि. १८.०९.२०२५ रोजी कर्तव्यावर असताना, पॉईंट क्रमांक १०१ बी येथे क्रॉसिंगचा नोझ तुटलेला असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना कळविले. त्यांच्या सतर्कतेमुळे आणि नेमक्या निरीक्षणामुळे संभाव्य अपघात टळला.

भुसावळ विभाग

११. श्री पियुष माहेश्वरी, वरिष्ठ विभाग अभियंता (पर्मनंट वे), भुसावळ, भुसावळ विभाग, ११.१०.२०२५ रोजी कर्तव्यावर असताना, त्यांना एका मालगाडीच्या वॅगनमधून धूर येत असल्याचे दिसले. त्यांनी ताबडतोब संबंधित सर्वांना माहिती दिली. जळगाव स्थानकावर ट्रेन थांबवण्यात आली आणि तपासणीत ब्रेक ब्लॉक जाम झाल्याचे आढळून आले. त्यांच्या सतर्कतेमुळे आणि बारकाईने निरीक्षणामुळे संभाव्य दुर्घटना टाळता आली.

महाव्यवस्थापकांनी पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले, त्यांच्या सतर्कतेचे आणि कर्तव्याप्रती असलेल्या वचनबद्धतेचे कौतुक केले आणि विश्वास व्यक्त केला की त्यांचे उदाहरण इतरांना प्रवाशांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आणि जीवन, मालवाहतूक आणि रेल्वे मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी प्रेरणा देईल.

या प्रसंगी श्री प्रतीक गोस्वामी, अतिरिक्त महाव्यवस्थापक; श्री चंद्र किशोर प्रसाद, प्रधान मुख्य संरक्षा अधिकारी तसेच इतर प्रधान विभागप्रमुख आणि मध्य रेल्वेने वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



# लातूरकर आनंदी होतील अशी बातमी लवकरच मिळेल : ना. आशिष शेलार

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक मंत्री मा. ना. आशिषजी शेलार हे लातूर दौऱ्यावर होते. त्यांच्या उपस्थितीचे औचित्य साधून लातूरच्या रंगकर्मी सोबत संवाद कार्यक्रम झाला. अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेचे अध्यक्ष ॲड. शैलेश गोजमगुंडे यांच्या पुढाकारातून पार पडलेल्या या कार्यक्रमात, सुरुवातीलाच यंदा राज्यनाट्य स्पर्धेच्या पारितोषिक रकमेत व निर्मिती खर्चात केलेल्या घवघवीत वाढीच्या निर्णयासाठी मंत्री महोदयांचे अभिनंदन केले व आभार मानले.

प्रसंगी लातूरच्या सांस्कृतिक वृद्धीसाठी अनेक मागण्या मंत्री महोदयासमोर ठेवण्यात आल्या.

ॲड. शैलेश गोजमगुंडे जेष्ठ रंगकर्मी बाळकृष्ण धायगुडे, रवी आघाव, नृत्य दिग्दर्शक मयूर राजापुरे आदींनी प्रतिनिधिक स्वरूपात विषय मांडले. ज्यात लातूरसाठी पुढील मागण्या विशेषत्वाने करण्यात आल्या.

* लातूरच्या प्रलंबित नाट्यगृहाचे काम त्वरित पूर्ण व्हावे व छत्रपती शिवाजी महाराज चौकात नविन अद्ययावत नाट्यगृह व्हावे,

* लातूरला राज्यनाट्य स्पर्धेच्या धर्तीवर बालनाट्य स्पर्धेचे केंद्र मंजूर करावे.

* शासनाचे बालनाट्य व प्रौढ नाट्य शिबीर लातूरला आयोजित करावे.

* लातूरमध्ये बालकलाकारांसाठी स्वतंत्र छोटे नाट्यगृह उभारावे.

* शासनाच्यावतीने मराठवाडा स्तरावर स्वतंत्र बालकलामहोत्सवाचे आयोजन व्हावे. त्याची सुरुवात लातूर मधून व्हावी.

यासोबतच मराठवाडा व महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वृद्धीच्या दृष्टीने उपयुक्त ठरणाऱ्या मागण्या करण्यात आल्या. त्या पुढील प्रमाणे...

* येडशीच्या डोंगरात हैद्राबादच्या रामोजी फिल्म सिटीच्या धर्तीवर फिल्म सिटी उभी करावी.

* नविन शैक्षणिक धोरणात शालेय शिक्षणात नाटक या विषयाचा समावेश करावा.

* शासनाच्या क्रीडा विभागातर्फे घेण्यात येणारा सांस्कृतिक युवा महोत्सव हा सांस्कृतिक विभागाने आयोजित करावा.

* राज्यनाट्य स्पर्धेच्या धर्तीवर शासनाने राज्य नृत्य स्पर्धेचे आयोजन करावे.

* शासन स्तरावर बाल कलाकारांसाठी प्रतिवर्षी स्वतंत्र पुरस्कार देण्यात यावेत.

आदी मागण्यावर प्रतिसाद देत मा. मंत्री महोदयांनी सर्व विषयांचा रीतसर आढावा घेतला. प्रत्येक विषयाला न्याय मिळेल असे सांगत लवकरच लातूरकर आनंदी होतील अशी बातमी मिळेल असे उच्चारताच सर्व उपस्थितानी टाळ्याचा कडकडाट केला.

अत्यंत खेळीमेळीच्या पण उपयोगी ठरलेल्या या संवाद कार्यक्रमात मा. आ संभाजी पाटील निलांगेकर, अर्चनाताई पाटील चाकूरकर, अजित पाटील कव्हेकर यांच्यासह नाट्य परिषद, नृत्य परिषद, बालरंगभूमी परिषद, कलोपासक, नाट्यस्पंदन, सूर्यो दय आदी संस्थांचे प्रतिनिधी म्हणून ॲड. शैलेश गोजमगुंडे, जेष्ठ रंगकर्मी बाळकृष्ण धायगुडे, श्रुतिकांत ठाकूर, संजय अयाचित, अजय गोजमगुंडे, डॉ. मुकुंद भिसे, शरद कुलकर्णी, प्रा. दिपक वेदपाठक, प्रशांत जानराव, गणपत कुलकर्णी, अनील पुरी, राजन अयाचित, प्रा. अनिरुद्ध जाधव, मयूर राजपुरे, प्रा. नवलाजी जाधव, रणजित आचार्य, रवी आघाव, प्रिती ठाकूर, तेजश्री घवले, वसुधा पाटील, अंजली कांदे, तन्मय रोडगे, महेश पवार, महेश बिडवे, महादेव कानगुले, विश्वजित पांचाळ, विशाल वाटवडे, संदेश शिंदे आदी उपस्थित होते.

## ही रंगभूमी..

रंगभूमी महोत्सव
सुसंपन्न दिमाखात
स्तुती सुधा पाघळे
गोडवे मुखामुखात

गाजा वाजा दंगला
डंकानाद मुलखात
घरो घरी जाऊ घेऊ
रंग कर्मी मुलाखात

फुलेउत्साह कमळे
सु शोभित आखात
साफ सुथरा दुरुस्त
नाट्य मार्ग उत्खात

नाट्यप्रेमी वळवावे
सकलमाफ जखात
आधीचेप्रस्ताव सर्व
भलेपडले धूळखात

नाट्यपरिक्षण चाले
चर्चाशिंगाखातखात
नाट्य प्रशिक्षण हवे
ठराव करे एकसाथ

नाट्य गृहे उभारावी
आलिशान विख्यात
लिहाकुणी नाटकेही
पुढे ना येती प्रख्यात

कळेना फसू लागले
एआयचे विळख्यात
भय व्यक्त करे भक्त
प्रयास जाई वाह्यात

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.



## वलांडीत मोकाट श्वानांचा उच्छाद; ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष:प्रशासनाच्या निष्क्रियतेवर तीव्र संताप, निर्बिजीकरण व बंदोबस्त करण्याची वलांडी ग्रामस्थांची मागणी

**लातूर/प्रतिनिधी :** वलांडी तालुक्यातील वलांडी गावात मोकाट श्वानांचा त्रास दिवसेंदिवस वाढत असल्याने नागरिकांच्या दैनंदिन जीवनात भीतीचे सावट पसरले आहे. दिवाळीची सुट्टी संपून शाळा सुरू झाल्याने, लहान मुले, मॉर्निंग वॉकसाठी जाणारे नागरिक आणि रात्री उशिरा घरी परतणारे कर्मचारी या श्वानांच्या टोळक्यांमुळे भयभीत झाले आहेत.जवळच्या देवणी आणि बोरोळ येथे नुकत्याच झालेल्या वन्यप्राण्याच्या हल्ल्यांमुळे वलांडीसह परिसरातील नागरिकांमध्ये प्राण्यांविषयी आधीकच भीतीचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर वलांडी गावात श्वानांची संख्या झपाट्याने वाढली असून त्यांनी उच्छाद मांडला आहे. काही अज्ञात व्यक्तींनी चारचाकी वाहनांतून कुत्री गावात आणून सोडल्याचा ग्रामस्थांना संशय आहे.भटक्या श्वानांच्या निर्बिजीकरणाबाबत आणि बंदोबस्तासाठी ग्रामपंचायतीने कोणती ठोस पाऊले उचलली? यावर किती निधी खर्च झाला? याची उत्तरे ग्रामस्थांना अपेक्षित आहेत. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे श्वानांची संख्या वाढत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. वारंवार निवेदने देऊनही ग्रामपंचायतीकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे.

# मौलाना आझाद जयंती शिक्षण दिनी व्याख्यान अ. भा. समाजवादी शिक्षण हक्क सभेच्या तेराव्या विशेषांकाचे लातूर येथे प्रकाशन

## डॉ.नारनवरे व डॉ.जावडेकर यांची उपस्थिती

**लातूर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभा जिल्हा शाखेच्यावतीने, मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंती व शिक्षण दिना निमित्त, सोमवार दि.१० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५.०० वाजता, बाबासाहेब परांजपके फाउण्डेशन वाचनालय क्रिडा संकूल लातूर येथे, प्रसिद्ध अभ्यासक तथा व्याख्याते प्रा. डॉ. अशोक नारनवरे व पुणे येथील ज्येष्ठ समाजवादी शिक्षण तज्ञ, विचारवंत तथा संपादक प्रा. डॉ. शरद जावडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये, तर राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष साथी पांडुरंग देडे यांच्या अध्यक्षतेखाली, शिक्षण हक्क पत्रिकेच्या ' शैक्षणिक तत्ववेते आणि त्यांची प्रासंगिकता ' या विषयावरील, १३ व्या विशेषांक प्रकाशन व जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी प्रसिद्ध विचारवंत तया व्याख्याते प्रा. डॉ.अशोक नारनवरे यांच्या हस्ते, संघटनेच्या मासिक मुखपत्र शिक्षण हक्क पत्रिकेच्या महत्वपूर्ण व वैचारिक अशा विशेषांकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. आणि त्यानंतर शोषितांचे शिक्षण व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० या विषयावर, संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. शरद जावडेकर व डॉ. अशोक नारनवरे हे, संयुक्तपणे सुमारे एक तासाची स्वतंत्र मांडणी करणार आहेत. आणि त्यानंतर अर्धा तास निमंत्रित मान्यवर श्रोते, विद्यार्थी व कार्यकर्त्यांच्या खुल्या प्रश्नोत्तर–चर्चेचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी संपादक मंडळाच्या सदस्या उर्मिलाताई पवार यांचीही, विचारपीठावर उपस्थित राहाणार आहे.

तेव्हा या महत्वपूर्ण अभ्यासू व वैचारिक अशा कार्यक्रमास विविध क्षेत्रातील जिज्ञासू , शिक्षणप्रेमी नागरिक, अभ्यासक, विद्यार्थी व संस्थात्मक, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी या बौध्दिकास उपस्थित राहावे असे जाहीर आवाहन, अ. भा. समाजवादी शिक्षण हक्क सभा जिल्हा शाखेसह, लातूर येथील पुरोगामी, परिवर्तवादी, समविचारी, हितचिंतकांनी, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले आहे.


निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लब मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क
Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

टोनर रिफिलिंग

फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

मध्य रेल्वे
सोलापुर मंडळ
ई–निविदा सूचना
डीआरएम (एस अँड टी) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताचे राष्ट्रपती यांच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहेत. **स्थानासह कामाचे नाव:** सोलापूर विभागातील अक्कलकोट रोड आणि मलठण स्थानकांवर लांब पल्ल्याच्या लूप लाईन्सची तरतूद. **कामाची अंदाजे किंमत:** ११,१८,४२,३४३.१०. **निविदा फॉर्मची किंमत:** शून्य. **जमा करावयाची बयाण रक्कम:** ७,०९,२००/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने. **निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:** २६/११/२०२५ रोजी १५.३० वा. तपशील IREPS वेबसाइटवर उपलब्ध आहेत. जर काही असेल तर शुद्धीपत्रक/सुधारणा फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि www.ireps.gov.in वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. अर्नेस्ट मनी (EMD) पेमेंट नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटी स्वरूपात स्वीकारले जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजेच बोली सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) निविदा दस्तऐवजात दर्शविल्याप्रमाणे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याला वैयक्तिकरित्या वितरित करावी. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.
**डीआरएम (एस अँड टी) सोलापूर**
**ई–निविदा सूचना क्रमांक: एसयूआर–एन–टी–२०२५–२६–२३ तारीख: ०४/११/२०२५**
अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है
Sai/SUR/61


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६